# विधान परिषद निवडणुकीत महायुतीची सरशी


रायगड, नवी मुंबई

**राम प्रहर**

◆ वर्ष १६ ◆ अंक ३५६
www.ramprahar.com

शनिवार, १३ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


'लाडकी बहीण योजनेसाठी वेबपोर्टल सुरू करणार'/२

फेसबुकद्वारे आमिष; सात तोतया पोलिसांना अटक/६

बल्गेरियाई बॅडमिंटन स्पर्धेत रक्षा कंदासामीला रौप्यपदक/८


## शेकापचे जयंत पाटील पराभूत



## मते फुटल्याने महाविकास आघाडीमध्ये खळबळ

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषद निवडणुकीत महायुतीने बाजी मारली असून नऊ उमेदवार विजयी झाले आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीला दोन जागांवर समाधान मानावे लागले. आघाडीतील शेकापचे जयंत पाटील यांचा दारुण पराभव झाला.

महायुतीच्या विजयी उमेदवारांमध्ये भाजपच्या पंकजा मुंडे (२६ मते), परिणय फुके (२६ मते), योगेश टिळेकर (२६ मते), अमित गोरखे (२६ मते), सदाभाऊ खोत (२३ मते, दुसऱ्या पसंती क्रमांकाने विजयी); शिवसेनेच्या भावना गवळी (२४ मते) व कृपाल तुमाने (२५ मते); तर राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश विटेकर (२३ मते) व शिवाजीराव गर्जे (२४ मते) यांचा समावेश आहे. महाविकास आघाडीकडून काँग्रेस उमेदवार प्रज्ञा सातव (२५ मते) आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे मिलिंद नार्वेकर (२२ मते, दुसऱ्या पसंती क्रमांकाने विजयी) निवडून आले, मात्र राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष समर्थित शेकापचे जयंत पाटील यांना अवघी १२ मते पडल्याने ते पराभूत झाले.

आमदार संख्या तुलनेने कमी असतानादेखील महायुतीने बाजी मारली आणि महाविकास आघाडीला धोबीपछाड दिला. या निवडणुकीत आघाडीची काही मते फुटली असून संशयाची सुई काँग्रेसवर आहे.

राज्य विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने चुरस होती. यामध्ये महायुतीच्या उमेदवारांना अपेक्षेपक्षा जास्त मते मिळाली, तर महाविकास आघाडीची मते फुटल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः काँग्रेसची अतिरिक्त सर्व मते आघाडीतील इतर उमेदवारांना मिळाली नाहीत. उद्धव ठाकरे पक्षाचे मिलिंद नार्वेकर दुसऱ्या क्रमांकाच्या मतांनी विजयी झाले, तर शेकापचे जयंत पाटील पडले.

**महायुतीला मोठा विजय मिळाला आहे. महायुती नऊच्या नऊ जागा जिंकणार असा विश्वास आम्ही व्यक्त केला होता. सर्व आमदार मतदारांचे मी अभिनंदन करतो. लोकसभा निवडणुकीत फेक नरेटिव्ह पसरविण्यात आले होते. त्याची सूज आता उतरू लागली आहे. हा विजय एक ट्रेलर आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनता नक्कीच विकासाला साथ देईल.**
**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**आज महायुतीसाठी आनंदाची गोष्ट आहे. आमचे नऊ उमेदवार निवडून आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही जेव्हा नऊ जागा लढवण्याचा निर्णय घेतला होता, त्या वेळी अनेक जण वल्गना करत होते. आमचे उमेदवार पडतील, अशा प्रकारे सांगितले जात होते, मात्र आज आम्हाला आमची मते मिळालीच, शिवाय महाविकास आघाडीची मतेदेखील आम्हाला मिळाली आहेत.**
**-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

**सातत्याने वेगवेगळ्या बातम्या पसरवल्या जात होत्या. आमच्याकडे ४२ मते होती, परंतु त्यापेक्षा अधिक मते आमदारांनी शिवाजीराव गर्जे आणि राजेश विटेकर यांना दिली. त्यासाठी सर्व आमदारांचे आभार मानतो. महायुतीची एकी यातून महाराष्ट्राला पहायला मिळाली. इथून पुढेही विधानसभेच्या निवडणुकीत अशीच एकी ठेवून महायुतीचे सरकार राज्यात निवडून आणण्यासाठी परिश्रम घेऊ.**
**-अजित पवार, उपमुख्यमंत्री**

## बनावट पावत्यांसंदर्भात फौजदारी कारवाई करणार

### महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे आश्वासन




**मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यात गौण खनिजांच्या वाहतुकीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून गौण खनिज वाहतूक पास देण्यात आले. विशेषतः रायगड जिल्ह्यातील इम्युनिटी वेलकॉन व मे इम्युनिटी गौरव बी.के. आणि भारतीय इन्फ्रा प्रोजेक्ट्स लि. जे.व्ही. या दोन कंपन्यांनादेखील गौण खनिज वाहतूक पास दिलेले होते. या कंपन्यांनी गौण खनिज वाहतुकीसाठी बनावट वाहतूक पास पुस्तिका छापून व त्या खऱ्या भासवून त्यांचा गौण खनिज वाहतुकीसाठी वापर केल्याची बाब निदर्शनास आली आहे तसेच त्याबाबतीत या कंपन्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात सन २०२३मध्ये फिर्याद दाखल होऊनदेखील या कंपन्यांकडून गौण खनिजांची वाहतूक चालू असून त्यामुळे आरोपींना अभयही मिळाले आहे. **(पान २ वर..)**

## 'निर्धार ग्रामीण विकासाचा'

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते माहिती पुस्तिकेचे प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

गावातील प्रत्येक व्यक्तीचे जीवनमान उंचवावे या हेतूने ग्रामविकास विभाग काम करीत आहे. ग्रामीण आवास योजना ते महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी राबविण्यात येणारे 'उमेद' अभियान यासह केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना ग्रामविकास विभाग ग्रामविकासमंत्री यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे राबवित आहे. ग्रामीण जनतेच्या जीवनमानाशी संबंधित असलेल्या विविध योजना ग्रामविकास विभाग राबवितो. या योजनांची निर्धार ग्रामीण विकासाचा ही माहिती पुस्तिका सर्वांना उपयुक्त आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानभवन येथे पुस्तक प्रकाशनावेळी सांगितले.



पुस्तक प्रकाशनाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास व पर्यटनमंत्री गिरीश महाजन, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ग्रामविकास विभागामार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. या सर्व योजनांची माहिती निर्धार ग्रामीण विकासाचा या पुस्तिकेत आहे. ती सर्वापर्यंत पोहचवा.

### गावांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन तत्पर -मंत्री महाजन

या वेळी ग्रामविकासमंत्री गिरीष महाजन म्हणाले की, राज्याच्या विकासात ग्रामविकास विभागाचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. ग्रामीण गृहनिर्माण महाआवास अभियान, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यासह सर्व योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. प्रत्येक गाव समृद्ध व्हावे यासाठी रस्ते दर्जेदार करून हजारो गावे मुख्य रस्त्यांना जोडली जात आहेत. बचत गटांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले आहेत.

## स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आज 'सीकेटी'त विद्यार्थी गुणगौरव

### मान्यवरांची लाभणार सोहळ्यास उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे स्फुर्तिस्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून शनिवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी व पदव्युत्तर वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



या सोहळ्याचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी (निवृत्त आयएएस) आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे.

या सोहळयास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, महापालिकेच्या माजी उपमहापौर सीता पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, नितीन पाटील, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती असणार आहे.

या गुणगौरव सोहळ्यात सर्व पालक व विध्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी केले आहे.

## २५ जून संविधान हत्या दिन म्हणून पाळला जाणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेसने लादलेली आणीबाणी म्हणजे संविधानाची हत्या असल्याचे सांगत केंद्र सरकारकडून दरवर्षी २५ जूनला संविधान हत्या दिवस पाळणार असल्याचे घोषित करण्यात आले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या संदर्भात एक्सवरून माहिती दिली.

केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी म्हटले आहे की, २५ जून १९७५ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हुकूमशाही मानसिकतेचे लाजिरवाणे प्रदर्शन करून देशावर आणीबाणी लादली व आपल्या लोकशाहीच्या आत्म्याचा गळा घोटला. कोणताही दोष नसताना लाखो लोकांना तुरुंगात टाकण्यात आले आणि माध्यमांचा आवाज बंद करण्यात आला. सरकारने दरवर्षी २५ जून हा दिवस संविधान हत्या दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे.

शाह यांनी पुढे सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारला त्या लोकांचा सन्मान करायचा आहे, ज्यांनी हुकूमशाह सरकारकडून देण्यात आलेल्या असंख्य यातनांचा सामना करून लोकशाहीच्या पुनरुज्जीवनासाठी संघर्ष केला. संविधान हत्या दिवस हा काँग्रेससारख्या कुठल्याही हुकूमशाही मानसिकतेला भविष्यात याची पुनरावृत्ती करता येऊ नये म्हणून प्रत्येक भारतीयाच्या मनात लोकशाहीचे रक्षण आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या अमर ज्योतीला जिवंत ठेवण्याचे काम करेल.

## किल्ले रायगडावर दरड कोसळली

### मार्ग बंद असल्याने जीवितहानी टळली

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर महादरवाजाच्या खाली सपाट मार्गावर शुक्रवारी (दि. १२) सकाळी दरड कोसळली असून यामुळे रायगडावरील लोखंडी कठड्यांचे नुकसान झाले आहे. काही दिवसांपूर्वी रायगड किल्ल्याचा पायरी मार्ग बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. हा निर्णय योग्य असल्याचे या घटनेमुळे सिद्ध झाले आहे.

काही वर्षांपासून रायगडावरील पायरी मार्गावर तसेच गड परिसरात दरड कोसळण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. गतवर्षी दरड कोसळून एका पर्यटकाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर प्रशासनाने मागील वर्षी पावसाळ्यात किल्ला पर्यटकांसाठी बंद ठेवला होता. या वर्षी गड सुरू असल्याने ७ जुलैला झालेल्या अतिवृष्टीमध्ये पायरी मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने पर्यटक अडकून पडले होते. त्यामुळे यंदाही ८ जुलैपासून किल्ला पायी मार्ग पर्यटकांसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला. आता गडावरील पायरी मार्ग बंद असून केवळ रोप वेनेच गडावर जाण्याची मुभा आहे.



महाड परिसरात शुक्रवारी रात्रीपासूनच अतिवृष्टी होत असून सकाळी रायगड किल्ल्यावर महादरवाजाच्या खाली असलेल्या सपाट पाय मार्गावर दरड कोसळली. गडावरील भले मोठे दगड खाली आल्याने पायवाटेवर बांधलेले संरक्षक कठडे काही ठिकाणी तुटले आहेत. प्रशासनाने पायरी मार्ग बंद करण्याचा निर्णय घेतल्याने या ठिकाणी अनर्थ टळला. महसूल विभागाकडून या घटनेची नोंद घेण्यात आली आहे.

(छाया : शंतनू नाझरे)



**सोलापूर : आषाढी एकादशी सोहळ्यासाठी पंढरपूरला निघालेल्या संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा भव्य गोल रिंगण सोहळा अकलुज येथे रंगला. या वेळी देवाचा अश्व धावताना लाखो वारकऱ्यांच्या मेळ्याचे ड्रोनच्या सहाय्याने टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य महाशिबिराची आज नियोजन बैठक

**पनवेल :** दरवर्षीप्रमाणे यंदाही आरोग्य महाशिबिर आयोजित करण्यात आले असून शनिवारी (दि. १३) खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ५.३० वाजता नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, भारतीय जनता पक्ष पनवेल व रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकी म्हणून पनवेल तालुका व शहरातील गरीब व गरजू जनतेसाठी विनामूल्य आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार महाशिबिराचे आयोजन रविवारी (४ ऑगस्ट) सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत सीकेटी महाविद्यालय येथे करण्यात आले आहे.



# ‘लाडकी बहीण’साठी आता वेबपोर्टल

## ■ मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची माहिती

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी राज्यात मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या नोंदणीचा शुक्रवारी (दि.१२) दुरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकांच्या आयुक्तांकडून आढावा घेतला. विभागीय आयुक्त विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी या वेळी उपस्थित होत्या. या योजनेच्या नोंदणीसाठी येत्या काही दिवसांत वेबपोर्टल सुरू करून ही प्रक्रिया गतिमान करण्यात येणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.





या योजनेच्या लाभासाठी नोंदणी करण्यात येणाऱ्या सर्व मदत केंद्रावर योजनेच्या माहितीचे फलक लावण्याच्या सूचना करण्यात आल्या. मोबाईल ॲपद्वारे अर्ज करण्यासाठी आता अंगणवाडी सेविकांबरोबरच ग्राम स्तरावरील अन्य कर्मचाऱ्यांनाही नियुक्त करण्यात येणार आहे. नवीन बदलांसह शुक्रवारी या योजनेसंदर्भातील सुधारित शासननिर्णय निर्गमित होणार असल्याचेही या वेळी सांगण्यात आले. दरम्यान, नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमधील ग्रामीण व शहरी भागातील मदत केंद्रांवर ११ जुलै २०२४पर्यंत ७५ हजार ४९९ ऑनलाईन तर दोन लाख २५ हजार ६३५ ऑफलाईन असे एकूण तीन लाख एक हजार १३४ अर्ज प्राप्त झाले आहेत. नागपूर जिल्ह्यामध्ये एक लाख आठ हजार ४४१ अर्ज, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये १६ हजार ३४९ अर्ज, गडचिरोली जिल्ह्यामध्ये एक लाख पाच हजार ४२ अर्ज, वर्धा जिल्ह्यामध्ये १२ हजार ४४९ अर्ज, भंडारा जिल्ह्यामध्ये ३० हजार ७१९ अर्ज आणि गोंदिया जिल्ह्यामध्ये २८ हजार १४४ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती बिदरी यांनी दिली. नागपूर व चंद्रपूर महानगरपालिकांमध्ये ३२ हजार ४३५ अर्ज प्राप्त झाले आहेत. नागपूर महापालिकेने एकूण १० प्रशासकीय प्रभाग आणि ३८ निवडणूक प्रभागांमध्ये एकूण ४८ मदत केंद्र सुरू केले आहेत.

२१ ते ६५ वयोगटातील व २.५० लाखांपर्यंत कुटुंबाचे उत्पन्न असणाऱ्या महिलांना या योजनेसाठी नोंदणी करता येणार आहे. ज्या महिलांकडे १५ वर्षांपूर्वीचे केशरी व पिवळे रेशनकार्ड आहे त्यांना उत्पन्नच्या दाखल्याची गरज नाही. नोंदणीच्यावेळी आधारकार्डवरील नाव, पत्ता, आधारक्रमांक तसेच बँकखाते आदी माहिती अचूकपणे नोंदविण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

# राज्य शासनाचा अर्थसंकल्प सर्वांना न्याय देणारा -धैर्यशील पाटील



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका भाजप पावसाळी अधिवेशन अर्थसंकल्प २०२४ विषयावर चर्चासत्राचे आयोजन धाटाव येथील आरआयआरआय हॉलमध्ये करण्यात आले होते. या अधिवेशनात सामान्य जनतेचा विचार करुन अर्थसंकल्प मांडण्यात आला, असे मत भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले की, शासनाने या अर्थसंकल्पात शेतकरी, मुख्यमंत्री माझी बहीण योजना, वारकरी दिंडीसाठी निधी, जनसामान्यांसह आपली परंपरा, संस्कृती वैभव जपण्याचा प्रयत्न केला आहे. दिंडीच्या प्रत्येक मार्गावर त्या त्या ठिकाणी औषधोपचार केंद्र उभारली आहेत. शासनाने प्रथमच वारकरी सांप्रदायासाठी हा निर्णय घेतला. पंढरपूरला जाणारी वारीला आज अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. काही वर्षांपूर्वी कीर्तनकार वारकरी यांची शेवटची दिंडी अशी भीती वाटत असे, पण आता काळ बदलला आहे. वेगवेगळ्या पिढीतील कीर्तनकार या ठिकाणी येऊन कीर्तन करतात. अशा पद्धतीची असलेली वारकरी संप्रदायाची पंढरपूरच्या या वारकरी दिंडीला युनोस्कोची मान्यता मिळण्यासाठी राज्य शासनाने प्रस्ताव केला असल्याचे सांगितले.

या चर्चासत्रासाठी रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग, ज्येष्ठ नेते मारुती देवरे, दक्षिण रायगड युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, शहराध्यक्ष यज्ञेश भांड, दक्षिण रायगड उत्तर भारतीय सेल जिल्हाध्यक्ष सनील कुमार, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, दक्षिण रायगड उपाध्यक्ष सोपान जांबेकर, ज्येष्ठ नेते विष्णू मोरे, ज्येष्ठ नेते नितीन तेंडुलकर, संजय लोटणकर, रोहा तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, दक्षिण रायगड महिला मोर्चा सरचिटणीस जयश्री भांड यांसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘सीकेटी’मध्ये दोन दिवसीय युवा मानसरंग कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे १० आणि ११ जुलैदरम्यान समुपदेशन विभागाच्या वतीने युवा मानसरंग कार्यशाळा-पर्व-३ उत्साहात पार पाडले. एमएसएफडीए पुणे या संस्थेचे संचालक मिथिलेश भाकरे आणि तोषिता तांडेल यांनी या कार्यक्रमाचे प्रयोजन केले.

कार्यक्रमाची सुरुवात परिवर्तन संस्था, साताराचे समुपदेशक राजू इनामदार, रुपाली भोसले, राणी बाबर, कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आर्ट्स विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांच्या स्वागताने झाली. युवा मानसरंग कार्यशाळेच्या तिसऱ्या पर्वाचे उद्दिष्ट्य नातेसंबंध, लैंगिकता, परीक्षेचा ताण, करिअर असे होते. या सत्रामध्ये नातेसंबंध आणि लैंगिकता या दोन विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

पहिल्या दिवसाची सुरुवात विविध मोकळिका घेत आम्ही प्रकाशबीजे रुजवित चाललो या प्रेरणागीताने झाली. विविध खेळ खेळत एकीचे महत्त्व पटवून देत सर्व सहभागी विद्यार्थ्यांची ओळख करून घेण्यात आली. लैंगिकता म्हणजे काय याबद्दलचा सर्वांचा दृष्टिकोन जाणून घेण्यात आला, तसेच युवा मानसरंग पर्व-१ व २ कार्यक्रमाची उजळणी घेत रुपाली भोसले यांनी पहिल्या दिवसाची सांगता केली.

दुसऱ्या दिवशी राजू इनामदार यांनी विविध मोकळिका व प्रेरणागीते घेत कार्यक्रमाची सुरुवात करीत मानवी शरीर व त्याचे अवयव यांबद्दल माहिती दिली, तसेच स्त्री-पुरुष प्रजनन संस्था, मासिक पाळी, लैंगिकता याबद्दलची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर समलिंगी या वर्गातील लोकांचा समाजात आदर कसा राखता येईल या विषयीचे चर्चासत्र घेण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शिक्षकवर्ग प्रा. डॉ. भाग्यश्री भोईर, प्रा. अनिकेत सोनसुरकर, प्रा. सुचित्रा गवळे, प्रा. प्रज्योती देसाई, प्रा. सोनाली हुद्दार, प्रा. ऐश्वर्या रायकर, प्रा. अनिल नाक्ती, प्रा. करण कोळी, प्रा. अक्षय साईस आणि शिक्षकेतर कर्मचारी राजेंद्र कुपर्डे, मोहन पाटील व ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सूत्रसंचालन प्रा. हरिभाऊ खरात यांनी केले. समुपदेशन विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांनी एमएसएफडीए व परिवर्तन संस्थेचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रमाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

# खोपोलीतील दिव्यांग मुलांच्या शाळेला गळती

### वर्गखोल्यांमध्ये पाणीच पाणी; पालक चिंतेत

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर पारिषदेने दिव्यांग मुलांसाठी बांधलेल्या शाळेच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर नवे बांधकाम करण्यासाठी मशनरी वापरून ठोकाठोकी केल्यामुळे स्लॅब, भिंतींना तडे गेले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात स्लॅब गळत असून सर्वच वर्गखोल्यांमध्ये पाणीच पाणी झाले आहे. छताखालील पीओपीही पडले आहे. भविष्यात स्लॅब कोसळून दुर्घटना होण्यापेक्षा शाळेची दुरूस्ती होईपर्यत मुलांना शाळेत पाठविणार नसल्याचा निर्णय पालकांनी घेतला आहे.

शालोम एज्युकेशन सेंटर संचालित सोफिया दिव्यांग मुलांच्या शाळेला खोपोली नगर परिषदेने दिव्यांग भवन विरेश्वर मंदिरसमोरील वरची खोपोली येथे बांधून दिले आहे. काही दिवसांपासून इमारतीवर दुसरा स्लॅब टाकण्याचे काम सुरू केले आहे. ठोकाठोकीमुळे तडे गेले आहेत. ठेकेदार शाळेतील मीटरवरून कामासाठी वीज वापरत असल्याने अतिवापरामुळे शाळेची लाईट बंद असते. यासंबंधीची माहिती नगर परिषदेला निवेदनाद्वारे कळवूनही कोणतेही कारवाई झाली नसल्याचा आरोप होत आहे.

वर्गखोल्यांमध्ये पीओपी कोसळले असून वायर तुटल्या आहे. सर्व खोल्यांमध्ये पाणी साचले होते. माजी नगरसेवक किशोर पानसरे, माजी नगरसेविका जिनी सॅम्युअल, भाजप माजी शहराध्यक्ष विजय तेंडुलकर यांनी पाहणी केली. त्यानंतर बांधकाम अभियंता अनिल वाणी, अविनाश गायकवाड यांना पालकांनी सुनावले.

**अनेक अडीअडचणींवर मात करून दिव्यांग मुलांसाठी नगर परिषदेने भव्य शाळा बांधली आहे. शाळेच्या वरच्या मजल्यावर काम सुरू झाल्यापासून इमारत गळत आहे. याबाबत नगरपालिकेत पत्रव्यवहार करूनही दुर्लक्ष केले जात आहे.**

**-सुभा पाटणकर, मुख्याध्यापिका**



# रोहा भाजपकडून सरकारी कार्यालयांमध्ये राष्ट्रपती व पंतप्रधानांच्या प्रतिमेचे वाटप



**रोहे : प्रतिनिधी**

रोहे भाजपकडून विविध सरकारी कार्यालयांना पंतप्रधान व राष्ट्रपती यांच्या प्रतिमा देण्यात आल्या. या वेळी भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

सरकारी कार्यालयात राष्ट्रपती व पंतप्रधानांच्या प्रतिमा असणे बंधनकारक आहे, परंतु अद्याप सर्व सरकारी कार्यालयात पंतप्रधान व राष्ट्रपती यांच्या प्रतिमा आढळून येत नाहीत. हे हेरून रोहा भाजप शहर अध्यक्ष यज्ञेश भांड यांच्या संकल्पनेतून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जयंतीचे औचित्य साधून भाजप पदाधिकाऱ्यांनी रोहे शहरातील सरकारी मुख्य कार्यालयात भेट देऊन तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

भाजप रोहे शहराच्या वतीने सरकारी कार्यालयांना डिसेंबर २०२३मध्ये राष्ट्रपती व पंतप्रधानांच्या प्रतिमा लावण्यासाठी निवेदन पत्र दिले होते, परंतु निवडणूक आचारसंहिता किंवा इतर कारणांमुळे सदर प्रतिमा लावल्या नसल्यामुळे भाजप रोहे शहराच्या वतीने तहसील कार्यालय, भूमी अभिलेख, वन विभाग, पोलीस ठाणे, नगर परिषद, प्रांत कार्यालय या सरकारी कार्यालयांना प्रतिमा देण्यात आल्या.

या वेळी भाजप रोहे शहराध्यक्ष यज्ञेश भांड, माजी तालुकाध्यक्ष तथा उपनगराध्यक्ष वसंत शेलार, शहर उपाध्यक्ष राकेश गुंदेशा, उमेश शेडगे, चिटणीस संदीप चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पान १ वरून

### बनावट पावत्यांसंदर्भात फौजदारी कारवाई करणार

बनावट पावत्या छापून शासनाशी करार असलेली सूर्या इन्फोटेक कंपनी राज्यभर खनिजमाफियांशी संगनमत करून बेकायदेशीर पावती पुस्तके पुरवित आहे आणि या अनुषंगाने शासनाचा महसूल चुकविणाऱ्याविरुद्ध कारवाई करून महसुलाची चोरी रोखण्याकरिता संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, अशी लक्षवेधी सूचना आमदार जयकुमार गोरे यांनी उपस्थित केली होती. या लक्षवेधी सूचनेवर आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी सभागृहात उपप्रश्न उपस्थित केला.

आमदार महेश बालदी यांनी उपप्रश्नात म्हटले की, शासनाच्या महसुलामध्ये घोटाळा करणाऱ्या कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्याचा निर्णय घेतला आणि त्याच्यावर कारवाई करण्याचा हा निर्णय योग्य व स्वागतार्ह आहे. हा माझ्या मतदारसंघातील प्रश्न आहे. त्यामुळे मला याची पूर्ण माहिती आहे. बनावट पावत्या छापून पावती बुके होती. ज्या महसूल अधिकाऱ्यांनी हा घोटाळा पकडला त्यांचे खरोखर अभिनंदन करायला हवे, पण आज अनेक महिने झाले हा नोटा छापण्यासारखा प्रकार आहे. एक पावती १४०० ते १६०० रुपयांची होते. या अनुषंगाने आजही गुन्हे दाखल आहेत, पण त्यांच्यावर कारवाई होत नाही आणि हा शासानाकरिता गंभीर विषय आहे. त्यामुळे या संदर्भात महसूल खात्याने कारवाई केल्यानंतर आतापर्यंत किती जणांवर कारवाई झाली, असा सवाल आमदार महेश बालदी यांनी उपस्थित केला.

बनावट पावत्यांचा सुळसुळाट थांबला तर शासनाचे गौण खनिज उत्पन्न दुप्पट होईल. यामध्ये अवैध आणि नको त्या प्रवृत्ती घुसतात. त्यामुळे वैध धंदा करणाऱ्याला मोठी अडचण होते. त्यामुळे बनावट पावती आणि त्या अनुषंगाने बिना रॉयल्टी गौण खनिज चालतंय. त्याच्यावर सरकार तेवढ्याच गांभिर्याने कारवाई करेल का, असाही मुद्दा आमदार महेश बालदी यांनी उपस्थित केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपप्रश्न उपस्थित करताना, अशा प्रकारचा गुन्हा आढलला आहे तेथे तातडीने कारवाई होण्याची आवश्यकता आहे. केवळ त्या चालकावर गुन्हा दाखल होऊन चालणार नाही तर ज्यांनी अशा बनावट पावत्या छापल्या व दाखल केल्या त्यांच्यावरही तातडीने गुन्हे दाखल होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ते किती कालावधीत होणार आणि त्या संदर्भात शासन सभागृहाला किती कालावधीत अवगत करणार, अशी विचारणा करत कारवाईची मागणी केली.

राज्याचे महसूलमंत्री राधकृष्ण विखे-पाटील यांनी यावर सभागृहात उत्तर देताना सांगितले की, या संदर्भात चालकावर गुन्हा दाखल झाला, मात्र कंपनीवर गुन्हा दाखल होणे गरजेचे होते. त्या अनुषंगाने कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची नव्याने सूचना दिल्या आहेत तसेच बेकायदेशररित्या व्यवहार करण्याच्या विरोधातही गुन्हा दाखल करण्याची सूचना करण्यात आली आहे. बनावट पावत्यांचे रॅकेट लक्षात घेता उत्खननाचे काम झाले त्या ठिकाणी पावत्या खऱ्या आहेत की खोट्या याची तपासणी करण्याचे आदेश राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्याचबरोबर बनावट पावत्या कुणी छापल्या याची चौकशी करणार आणि फौजदारी गुन्हा दाखल करून कारवाई करणार असल्याचे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले.

# शेअर बाजारातील नफ्याचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक

**पनवेल** : खारघरमध्ये राहणाऱ्या एका महिलेला शेअर बाजारात रक्कम लावल्यास अधिकचा नफा मिळेल, असे आमिष दाखवून तब्बल सव्वाचार कोटी रुपयांची फसवणूक ऑनलाईन पद्धतीने भामट्यांनी केली आहे. खारघरमधील केशर हार्मोनी या इमारतीमध्ये राहणाऱ्या सुचेता अरुण पौडवाल यांना भामट्यांनी शेअर बाजारात खरेदी विक्री केल्यास सर्वाधिक नफा मिळेल यासाठी भामट्यांनी संपर्क साधला.

२८ एप्रिल ते ७ जुलैदरम्यान भामटे सुचेता पौडवाल यांच्या संपर्कात होते. सुचेता यांनी चार कोटी ४० लाख २५ हजार एवढी रक्कम गुंतवली होती. त्यापैकी पाच लाख ९३ हजार ५५७ रुपये त्यांना परत मिळाले. उर्वरीत चार कोटी ३४ लाख ३१ हजार रुपयांची फसवणूक झाल्याने सुचेता यांनी पोलीस ठाणे गाठले. सुचेता यांना ॲडवेन्ट इंटरनॅशनल डी-८७५ या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये भामट्यांनी सहभागी करून घेतले होते. याबाबत नवी मुंबई पोलिसांचे सायबर सेलचे पोलीस पथक विशेष तपास करीत आहे.

# रोहा राष्ट्रवादी महिला आघाडीतर्फे पाककला स्पर्धा



**रोहे : प्रतिनिधी**

रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य सांधून राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या वतीने मातोश्री मंगल कार्यालय येथे पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १०हून अधिक महिलांनी या पाककला स्पर्धत सहभाग घेतला होता. विविध खाद्यपदार्थ स्पर्धकांनी स्पर्धेसाठी तयार केले होते.

स्पर्धेचे बक्षीस वितरण माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, रत्नप्रभा कापरे, शहराध्यक्ष अमित उकडे, गटनेते महेंद्र गुजर, महिला अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, माजी नगरसेविका शिल्पा धोत्रे, मानसी दाते, युवती अध्यक्ष रुचिका जैन, आसावरी मोकल, स्वरांजली शिर्के, सौ. कोलाटकर, रवी चाळके आदी उपस्थित होते

**सेजल खराडे प्रथम**

स्पर्धेत प्रथम क्रमांक सेजल दीपक खराडे (फ्रिज), द्वितीय क्रमांक सायली बापट (ओव्हन), तृतीय क्रमांक अर्चना गुप्ता (मिक्सर), उत्तेजनार्थ पल्लवी नाकती, ज्योत्स्ना कांबळे (डिनर सेट) यांनी पटकावले. माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांनी सर्व स्पर्धकांनी केलेल्या पाककृतीची कौतुक केले. स्पर्धेचे परीक्षण हॉटेल मिरजचे साजन, सुरुची हॉटेलचे देसाई यांनी केले.

या वेळी शहराध्यक्ष अमित उकडे यांनी खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी नेहमीच महिलांसाठी विशेष कार्यक्रम राबविले असल्याचे सांगत या वेळी महिलांनी केलेले पदार्थ रुचकर असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी दाते यांनी केले.

## निवडक

### वाहतूक शाखेकडून चालकांचे प्रबोधन



**पनवेल** : नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत गव्हाण फाटा वाहतूक शाखेकडून चालकांना मद्यप्राशन करून वाहन न चालवणे तसेच चालत्या वाहनात मोबाईलचा वापर न करणे, अवजड वाहन डाव्या बाजूने चालवण्याबाबत मार्गदर्शन करून प्रबोधन करण्यात आले. या वेळी नवी मुंबईचे वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूकच्या शाखेच्या पोलीस निरीक्षक गलांडे, हवालदार पाटील, कॉन्स्टेबल अवताडे आदींनी प्रबोधन केले.

### लाडकी बहीण योजनेकरिता शिबिर

**पनवेल** : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना घरोघरी पोहचवण्यासाठी खारघर शिवसेना महिला पदाधिकाऱ्यांतर्फे शिबिराचे आयोजन ओवे कॅम्प येथे करण्यात आले होते. खारघर येथे सेक्टर ३५ संघटिका ज्योती नाडकर्णी व सेक्टर ३४ संघटिका निखत भाटकर, शाखाप्रमुख निवृत्ती सकपाळ आणि श्रीरंग भातोसे यांचे मदतीने शिबिर झाले. मंगेश रानवडे यांनी महिलांना मार्गदर्शन करून पात्र महिलांची योजनेंतर्गत फॉर्म भरून घेतला.

### पनवेलमध्ये दुचाकीची चोरी

**पनवेल** : शहरातील तक्का परिसरातून एक दुचाकी चोरीस गेल्याची घटना घडली आहे. कमलाकर साळुंखे यांनी त्यांची १० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची दुचाकी (एमएच ४६ टी ५५७४) ही ब्ल्यू स्टार गॅरेज तक्का येथे उभी करून ठेवली असता, अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### चुलत भावाकडून बहिणीवर अत्याचार

**पनवेल** : तालुक्यातील सूकापूर परिसरातील मालेवाडी एका २३ वर्षीय मुलीवर चुलत भावाने अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात शुक्रवारी पहाटे बलात्काराचा गुन्हा दाखल केला असून पोलीस अत्याचारी भावाचा शोध घेत आहेत. मालेवाडी येथील २३ वर्षीय तरुणाने चुलत बहिणीचा विश्वास संपादन करून तिला प्रेमसंबंधात गुंतवले. मागील वर्षी ३० ऑक्टोबर ते १७ जूनपर्यंत अत्याचारासाठी भाड्याने वेगळे घर घेऊन पीडितेवर अत्याचार केल्याचे पीडितेने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

### युरीया डिएपी ब्रिकेट विक्रीस उपलब्ध

**पनवेल :** सध्या भात पुनर्लागवडीचा हंगाम सुरू आहे. अशा वेळी युरीया डिएपी-ब्रिकेट गोळ्यांचा वापर केल्यास दिर्घकाळ खत उपलब्धता, पर्यावरणपूरक, खर्चात बचत साधून भात उत्पादनामध्ये भरघोस वाढ होऊ शकते. खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल येथे युरीया डिएपी-ब्रिकेट (खत गोळ्या) तयार असून याचा लाभ पनवेल येथील स्थानिक व आजूबाजूच्या शेतकऱ्यांना व्हावा या अनुषंगाने विक्रीस उपलब्ध करण्यात आले आहे. याचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन खार जमीन संशोधन कार्यालयातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जी. के. खोपकर दूरध्वनी (८२७५२७००७८) यांच्याशी संपर्क साधावा.

# पनवेलमध्ये माझी लाडकी बहीण योजनेला प्रतिसाद

## महानगरपालिका कार्यक्षेत्रात २० ठिकाणी मदत कक्ष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांचे आरोग्य, पोषण व आर्थिक स्वावलंबनासाठी राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. महापालिका कार्यक्षेत्रात या योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद पाहून आता महापालिकेच्या वतीने ३१ ऑगस्टपर्यंत पाच प्रभागांमध्ये २० ठिकाणी मदत कक्ष उभारण्यात आले आहेत. या मदत कक्षांतर्गत योजनेचे अर्ज भरण्यात येत आहेत. महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थी महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.



महानगरपालिका कार्यक्षेत्रात सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महापालिकेने विशेष नियोजन केले आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या बँक खात्यात डीबीटीद्वारे दरमहा दीड हजार इतकी रक्कम दिली जाणार आहे.

उपायुक्त संतोष वारूळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच प्रभागांमध्ये २० ठिकाणी मदत कक्ष उभारण्यात आली आहेत. याठिकाणी अंगणवाडी, आशासेविका, डेएनयुएलएम अंतर्गत बचत गटाच्या महिला, डाटा एन्ट्री ऑपरेटर, मदतनीस, शिपाई, सुरक्षा अधिकारी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**✻ मदत कक्षाची ठिकाणे ✻**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, रोहिदास वाडा समाज मंदिर, संत साईबाबा शाळा, तक्का गाव (मराठी शाळा)
2. खारघर प्रभाग समितीमध्ये टॅक्स ऑफिस, प्राईड सोसायटी (सेक्टर ७), विठ्ठल मंदिर बेलपाडा, खारघर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र.
3. कळंबोली प्रभाग समिती कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन (रोडपाली), गणेश मंदिर सेक्टर ८, स्वामी समर्थ मठ सेक्टर ४.
4. कामोठे प्रभाग समिती कार्यालय, सिडको कम्युनिटी हॉल, सेक्टर २१, मोठा खांदा शाळा, छोटा खांदा मंदिर
5. नावडे उपविभागीय कार्यालय, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र फेज २, तळोजा पाचनंद, ग्रामपंचायत कार्यालय टेंभोडे गाव, ग्रामपंचायत कार्यालय रोहिंजण गाव.

## बीसीटी विद्यालयात दहावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विद्यालयात शुक्रवारी (दि.१२) दहावीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात झाला.

या वेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, स्कूल कमिटी मेंबर शेखर तांडेल, विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, मुख्याध्यापिका अनुराधा काठे आदी उपस्थित होते.

मान्यवरांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयाच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते भव्य दिव्य वृक्षारोपणाच्या कार्यक्रम करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना ५०२ सीडबॉल्स तसेच एक हजार रोपांचे वितरण करीत झाडे लावा झाडे जगवा ही संकल्पना जोपासण्याचे आवाहन केले. मान्यवर तसेच गुणवंत विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे हस्ते विद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

## चिखले उपसरपंचपदी भाजपच्या पूजा पाटील बिनविरोध

### तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चिखलेच्या उपसरपंचपदाची निवडणूक शुक्रवारी (दि.१२) पार पडली. या निवडणुकीत भाजपच्या पूजा मंगेश पाटील यांची बिनविरोध निवड झाली. त्यांचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी सरपंच दिपाली तोंडले, माजी उपसरपंच सूर्यकांत पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रवीण पाटील, वर्षा पाटील, रघुनाथ पाटील, अविनाश पाटील, सुरेश पाटील, मानसी शेळके, प्रतीक्षा म्हात्रे, रेणुका चौधरी, भालचंद्र पाटील, आदिनाथ पाटील यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.



## गहाळ झालेले ८२ मोबाईल सापडले

### खारघर पोलिसांची कामगिरी; आणखी ८०० मोबाईलचा ट्रेस

**पनवेल : वार्ताहर**

चोरी आणि गहाळ झालेले मोबाईल १३ लाख ५० रुपयांचे ८२ त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले. खारघर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात संबंधित मोबाईल मालकांना परत करण्यात आले. आणखी ८०० मोबाईल ट्रेस करण्यात आले असून लवकरच मोबाईल हस्तगत करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कामगिरीबद्दल वरिष्ठांकडून खारघर पोलिसांचे कौतुक करण्यात आले आहे.



२०२३ ते २०२४दरम्यान खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेकांचे मोबाईल चोरी, तर काहींचे मोबाईल गहाळ झाले होते. याप्रकरणी मोबाईल चोरीसह हरविल्याची नोंद करून पोलिसांनी तपास सुरू केला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पथकातील गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे उपनिरीक्षक ज्ञानोबा धुळगंडे, फिरोज आगा, वाजिद शेख, सचिन डावरे, मोरे असे अन्य पोलीस पथकाने मुंबईसह इतर राज्यातून चोरीसह गहाळ झालेले १३ लाख ५० हजार रुपयांचे ८२ मोबाईल हस्तगत केले होते.

संबंधित मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना पोलीस ठाण्यात बोलवून परत करण्यात आले. या वेळी या मालकांनी खारघर पोलिसांचे आभार व्यक्त केले. इतर ८०० मोबाईलची माहिती काढण्यात पोलिसांना यश आले असून, लवकरच ते मोबाईल हस्तगत करून त्यांच्या मालकांना परत करण्यात येणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजीव शेजवळ यांनी या वेळी सांगितले.

## खारघर ते मुंबई विमानतळापर्यंत बससेवा सुरू करण्याची मागणी

**पनवेल** : खारघर ते मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत बेस्टची एस १०५ बस बंद करण्यात आलेली बससेवा पूर्ववत करण्यासाठी पनवेलच्या माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी बेस्टचे महाव्यवस्थापक यांना निवेदन दिले आहे.

ही बस खारघर शहरातील नागरिकांना मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ तसेच डोमेस्टिक विमानतळावर जाण्यासाठी अतिशय सोयीची होती. या बससेवेमुळे खारघर शहरातील प्रवाशांना मुंबईत व उपनगरात प्रवासासाठी चांगली सोय उपलब्ध होती. बेस्ट प्रशासनाने ही बससेवा बंद केल्यामुळे प्रवाशांचे हाल होत असून नाराजी पसरली आहे. त्यामुळे ही बससेवा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांनी केली आहे.

## तुपगाव मंदिराकडील रस्त्याचे काम पूर्ण

### • सरपंच रवींद्र कुंभार यांची वचनपूर्ती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक निधीतून तुपगाव येथील शंकर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात झाले. यासाठी सरपंच रवींद्र कुंभार यांनी पाठपुरावा केला होता. त्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे.

तुपगाव येथील शंकर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था खूप बिकट होती. या ठिकाणी महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. भाविकांना त्रास होऊ नये म्हणून सरपंच रवींद्र कुंभार व त्यांच्या सहकाऱ्यांनी याबाबत आमदार महेश बालदी यांना सांगताच त्यांनी या कामासाठी निधीची तरतूद केली.



या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर माजी आमदार देवेंद्र साटम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी सरपंच रवींद्र कुंभार, उपसरपंच सुयोग भालेकर, ग्रामपंचायत सदस्य स्वप्नील नागावकर, विजय ठोसर, ओमकार भालेकर व ग्रामस्थ उपस्थित होते. जागृत शिवशंकराच्या मंदिराकडील रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने दर्शनासाठी येणारे भक्तगण सरपंच रवींद्र कुंभार यांना धन्यवाद देत आहेत.

## पोर्ट कामगारांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य -केंद्रीय मंत्री शांतनू ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय जहाज व बंदरे राज्यमंत्री शांतनू ठाकूर यांची भारतीय पार्ट अ‍ॅण्ड डॉक मजदूर महासंघाच्या सदस्यांनी भेट घेत कामगारांच्या समस्यांबाबत चर्चा केली. या वेळी ना. शांतनू ठाकूर यांनी पोर्ट कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य देणार असल्याचे आश्वासन दिले.

ना. शांतनू ठाकूर म्हणाले की, कामगारांच्या समस्या समजून घेऊन पोर्टच्या चेअरमनशीही चर्चा करण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी शिष्टमंडळाला दिले. या वेळी पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, कोषाध्यक्ष सुधीर घरत, पोर्ट प्रभारी अण्णा धुमाळ, कोलकाता पोर्टचे समीर मुजूमदार आदी उपस्थित होते.

# पनवेलच्या गुळसुंदे गावात पर्पल राईसची लागवड

## प्रगतशील शेतकरी मिनेश गाडगीळ यांचा प्रयोग

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील गुळसुंदे गावातील प्रगतशील शेतकरी, कृषीभूषण मिनेश गाडगीळ यांनी आपल्या शेतामध्ये पर्पल राईस म्हणजेच इंडोनेशियातील थायोमल्ली जस्मीन भाताची लागवड केली आहे. हा तांदूळ विशेषतः लहान मुलांसाठी उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

गुळसुंदे येथील प्रगतशील शेतकरी महाराष्ट्र राज्य कृषीभूषण मीनेश गाडगीळ यांनी आपल्या शेतामध्ये आत्तापर्यंत विविध प्रयोग



करून अनेक नावीन्यपूर्ण उत्पादने घेतली आहेत.

ज्यामध्ये ड्रॅगनफ्रुट, स्ट्रॉबेरी, लाल तांदूळ, काळा तांदूळ, बासमती, आंबेमोहर, डायबेटीससाठीचा आरएनआर तांदूळ, कलर कलिंगड व मस्कमेलन इत्यादीचा त्यात समावेश आहे. यावर्षी मीनेश गाडगीळ यांनी नीळा तांदूळ म्हणजेच इंडोनेशियातील थायोमल्ली जस्मीन राईस जो लहान मुलांसाठी उपयुक्त याची लागवड केली आहे.

साधारण ३० ते ४० क्विंटल एकरी उत्पादन देणाऱ्या या जाती असून अनेक गुणधर्म या तांदुळात आढळून येतात ज्यामध्ये कमी ग्लॅयसेमिक इन्डेक्स, अ‍ॅन्टी ऑक्सिडंट इफेक्ट, अ‍ॅन्टी कॅन्सर इफेक्ट, विशेष प्रकारचा सुवास, शिजण्यासाठी कमी कालावधी इत्यादी व नैसर्गिक पिग्मेंटमुळे येणाऱ्या विविध रंगामुळे ग्राहकाची यास विशेष पसंती असल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील तांदूळ हा कोकणात पहिल्यांदाच घेतला गेला असून पर्पल राईस हा राज्यात पहिल्यांदाच तयार होईल. पीक तयार झाल्यानंतर वरील जातींचे बीयाणे तयार करून ते आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना आपण उपलब्ध करून देऊ, असा आशावाद मीनेश गाडगीळ यांनी व्यक्त केला.



**पनवेल : नवीन पनवेल सेक्टर १३ येथील समाजमंदिराच्या बाजूस असलेल्या गार्डनमधील झाड पावसामुळे रिकाम्या स्कूल व्हॅनसह रस्त्यावर पडले. यामुळे व्हॅनचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.**

## संपादकीय

# लौकिक टिकवावाच लागेल

भारतीय प्रशासकीय सेवेतील प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर यांच्यावर झालेले आरोप धक्कादायक असून केंद्र सरकार तसेच राज्य सरकार या दोहोंकडून या आरोपांची तातडीने गंभीर दखल घेण्यात आली आहे. देशभरात आदराने पाहिल्या जाणाऱ्या व अनेक बुद्धिमान व मेहनती विद्यार्थ्यांचे स्वप्न असणाऱ्या केंद्रीय लोकसेवा परीक्षांचा आजवरचा लौकिक टिकवायचा असेल तर या प्रकरणी कठोर कारवाई व्हावीच लागेल.

**अवास्तव मागण्या आणि अरेरावी वर्तनामुळे पुण्यातील प्रशिक्षणार्थी प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकर वादग्रस्त ठरल्या आणि नंतर तर त्यांच्या प्रशासकीय सेवेतील निवडीबद्दलच शंका निर्माण व्हावी असे तपशील बाहेर आल्याने हे एकंदर प्रकरण अधिकच खळबळजनक ठरले. या प्रकरणीच्या सर्व आरोपांची केंद्र सरकारने व राज्य सरकारनेही तातडीने गंभीर दखल घेतली आहे. पूजा खेडकर यांना तातडीने पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयातून हलवून त्यांची वाशिम येथे बदली करण्यात आली आहे. केंद्र सरकारने या प्रकरणी अतिरिक्त सचिवांची एकसदस्यीय समिती नेमली असून दोन आठवड्यांत चौकशी करून समिती अहवाल सादर करेल. पूजा खेडकर यांनी युपीएससीकडे सादर केलेल्या दृष्टीदोष आणि मानसिक आजारासंदर्भातील प्रतिज्ञापत्रांची चौकशी करण्याचे आदेशही केंद्र सरकारने दिले आहेत. या प्रमाणपत्रांचा वापर करून पूजा खेडकर यांनी परीक्षेतून सूट मिळवल्याचा आरोप आहे. परीक्षेत कमी मार्क मिळवूनही त्या उत्तीर्ण झाल्या. त्यांना देशभरातून ८४१वा क्रमांक मिळाला होता. केंद्रीय लोकसेवा आयोगाने त्यांना आजार सिद्ध करण्यासाठी तपासणीकरता बोलावले असता सहा वेळा नोटिसा देऊनही खेडकर उपस्थित राहिल्या नाहीत असे समोर आले आहे. कालांतराने आयोगाने त्यांच्या नियुक्तीला केंद्रीय प्रशासकीय लवादामध्ये आव्हान दिले. तेथील निकाल विरोधात जाऊनही त्यांची आयएएस अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. आता मात्र केंद्र सरकारकडून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणार आहे. पुण्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी तयार केलेला अहवालही केंद्र सरकारला पाठवण्यात येणार आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात परिविक्षाधीन अधिकारी म्हणून प्रशिक्षणासाठी येताच पूजा खेडकर यांनी आपले रंग दाखवण्यास सुरूवात केली. त्यांनी थेट अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अँटी चेंबरमध्ये स्वत:चे कार्यालय थाटले तसेच खाजगी गाडीवर लाल दिवा लावून त्या हिंडू लागल्या. याच काळात त्यांचे वडील, माजी सरकारी अधिकारी दिलीप खेडकर यांनी एका तहसीलदाराला आपल्या मुलीला स्वतंत्र दालन देण्याबाबत धमकावले असाही आरोप आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भातील अहवाल राज्य सरकारकडे पाठवला आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये दिलीप खेडकर हे अहमदनगर मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार होते, मात्र निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. दरम्यान, कारवाईनंतर पूजा खेडकर गुरुवारी वाशिम येथे रुजू झाल्या आहेत. प्रशिक्षणार्थी अधिकारी असताना बदली होण्याची ही एक दुर्मिळ घटना आहे. युपीएससीची परीक्षा म्हणजे जणु काही शिवधनुष्य असाच समज सर्वसामान्यांमध्ये प्रचलित आहे. या स्पर्धा परीक्षेसाठी प्रचंड मेहनत करावी लागते, मुलाखतीचे तंत्र आत्मसात करावे लागते. अतिशय उच्च कोटीचे सामान्यज्ञान अवगत असावे लागते, व्यक्तिमत्व चतुरस्त्र असावे लागते असे मानले जात असल्यामुळे असंख्य तरुण या स्पर्धा परीक्षांसाठी जीव तोडून मेहनत करत असताना हे खळबळजनक प्रकरण समोर आले आहे. त्यामुळे आरोपांत तथ्य आढळल्यास खेडकर यांना योग्य त्या कारवाईला तोंड द्यावेच लागेल. केंद्रीय लोकसेवा परीक्षांचा आजवरचा लौकिक टिकवून ठेवण्यासाठी या संदर्भात कठोर कारवाई करावीच लागेल.**

# स्वराज्यनिष्ठ शिलेदार बाजीप्रभू देशपांडे



१६१५मध्ये शिंद, भोर (महाराष्ट्र) येथे बाजीप्रभू देशपांडे यांचा जन्म झाला होता. चंद्रसेनीय कायस्थ प्रभू (ब्राह्मण परिवार) येथे जन्मले बाजी प्रभू देशपांडे एक वीर योद्धा होते. २०-२० तास कार्य करायचे कौशल ठेवायचे बाजीप्रभू. रामजींसाठी जसे हनुमान होते तसे शिवबांसाठी बाजीप्रभू होते. मराठा इतिहासात यांचा योगदान अविस्मरणीय आहे. राष्ट्र भक्ती आणि आपले शिवबांसाठी प्राण देण्यापूर्वी त्यांनी एकदाही विचार केला नाही आणि आपले कर्तव्य पूर्ण केले.

बाजीप्रभू यांनी पावनखिंडच्या (घोड खिंड) युद्धात आपले प्राण गमावून छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राणाचे रक्षण केले. जुलै १६६०, पन्हाळाच्या किल्ल्यात जिथे शिवबा रहात होते तिथे आदिलशाही जनरल सिद्धी जोहर यांनी वेढा घातला. शिवरायांना सुरक्षित विशालगड पोहोचवायला शिवबा आणि बाजी प्रभू यांनी मंत्रणा केली. त्यांनी सिद्धी जोहरला आत्मसमर्पण करायची माहिती दिली. सिद्धी जोहरचे लक्ष विचलित करण्यासाठी त्यांच्यामधूनच एक शिवा काशीद यांना शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत पाठवण्यात आले. सिद्धी जोहर हे लक्षात येईपर्यंत की शिबांचा रूप धरून शिवा काशीद यांना पाठवले आहे तोपर्यंत शिवबा, बाजीप्रभू आणि त्यांचासोबत ६०० सैनिक वेगळ्या मार्गाने निघाले.

जोहरच्या डोळ्यात धूळ उडवण्याचा हा प्रयास जास्त वेळ टिकला नाही. हे प्रकरण समजल्यावर त्याने शिवा काशिदला मारले. शिवा काशीद यांनी स्वतःच्या प्राणाचे बलिदान देऊन आपला योगदान दिला, पण आता सिद्धी जोहर हा रागात आल्याने त्याने शिवबांवर आक्रमणसाठी सिद्धी मसूद ह्याला पाठवला.

जोहरने सिद्धी मसूदला पाठवल्याची माहिती मिळताच बाजीप्रभू यांनी शिवरायांना पुढे प्रस्थान करायचा आग्रह केला, पण शिवराया इथे सहमत नव्हते. त्यांनी बाजी प्रभूंचा साथ देण्याची गोष्टी केली, पण बाजू प्रभूंनी त्यांना स्वराज्याला हवी त्यांची गरज समजावून तेथून जाण्यासाठी राजी केले. शिवबा निघताना बाजीप्रभूंना म्हणाले की 'आम्ही विशालगड पोहोचून तीन तोफेचे गोळे सोडू आणि हा संदेश मिळताच तुम्ही पण विशालगडला निघा'. इतके सांगून शिवबा विशाळगडसाठी निघाले.

६०० सैनिकांचे दलामधून ३०० शिवबांसोबत विशालगडला निघाले आणि इकडे शूरवीर बाजी प्रभू ३०० मराठा सैनिकांबरोबर सिद्धीचे १०,००० सैनिकांशी युद्ध करायला उभे होते. युद्ध घोड खिंडात (पावनखिंड) सुरू झाले आणि ३०० वीर मराठा सैनिकांनी सिंहगर्जना करून सिद्धीच्या सैनिकांवर हल्ला केला. शरीराचा कोणताही अवयव असा नव्हता जिथे बाजी प्रभुंना जखम झाली नसावी पण त्यांना कसलाही भान नव्हता. केवळ महाराज विशाळगडावर सुखरूप पोहचले याचा इशारा देणाऱ्या तोफांच्या आवाजाकडे त्यांचे कान होते. इकडे विशालडागवर सरदार सूर्यराव सुर्वे आणि जसवंतराव दळवी यांचा अधिपत्य होता. युद्धानंतर आणि संघर्षानंतर शिवबा विशाळगडावर पोहचले. तोपर्यंत प्रभू प्राणांची बाजी लावून लढत होते. तोफांचे आवाज ऐकल्यावर त्यांनी प्राण सोडले. ही घटना १३ जुलै १६६० रोजी घडली.

१८ तास निरंतर युद्ध करीत बाजीप्रभू मातृभूमीला समर्पित होऊन गेले. आपले रायांची सुरक्षेसाठी बाजीप्रभू आणि शिवा काशीद यांनी स्वतःचे प्राण गमावले आणि इतिहासात अमर झाले. यांच्या मृत्यूनंतर घोडखिंड ह्याचे नाव बदलून पावनखिंड केले गेले कारण बाजीप्रभू आणि त्यांच्यासारखे अखंड योद्धेच्या बलिदानाने ती भूमी पावन होऊन गेली होती.

**(साभार : इंटरनेट)**

# प्रसिद्ध मराठी कवयित्री इंदिरा संत



प्रसिद्ध मराठी भावकवयित्री इंदिरा संत यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म ४ जानेवारी १९१४ रोजी इंडी (जि. विजापूर, कर्नाटक) येथे झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव इंदिरा दीक्षित. त्यांचे शिक्षण बेळगाव, कोल्हापूर व पुणे येथे बीएबीटीपर्यंत झाले. मराठी आणि मानसशास्त्र या विषयांच्या अध्यापिका म्हणून तसेच बेळगाव येथील मराठी ट्रेनिंग कॉलेजच्या प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले.

बालपणापासून इंदिरा यांना लेखनाची आवड होती. कुटुंबातूनच घडलेले स्त्रीगीतांचे व ओव्यांचे संस्कार त्यांच्यातील कवयित्री घडताना उपयुक्त ठरले. १९३२ सालापासून त्या जाणीवपूर्वक लेखन करू लागल्या. लघुनिबंधकार ना. मा. संत यांच्याशी त्यांचा फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना परिचय झाला आणि त्याची परिणती विवाहात झाली. या दाम्पत्याच्या कविता सहवास (१९४१) या नावाने प्रसिद्ध झाल्या. बालकवी, माधव जूलियन्, अनिल आणि अनंत काणेकर यांचा प्रभाव या संग्रहातील कवितांतून जाणवतो. पुढे पतीच्या अकाली निधनानंतर एकलेपणाची तरल, अंतर्मुख भाववृत्ती घेऊन त्यांची कविता वेगळ्या रूपाने बहरली. जीवनातील स्वास्थ्यापेक्षा संघर्षावर श्रद्धा असणाऱ्या इंदिराबाईंनी लिहिलेली भावकविता ही मराठी साहित्याला लाभलेली अनमोल देणगी आहे. स्वानुभवाचा संयत, पण रेखीव आविष्कार हे त्यांच्या कवितेचे लक्षणीय वैशिष्ट्य होय. स्वतःची सुखदुःखे, प्रक्षोभ, कुंठितावस्थाचित्रित करताना लवलवत्या प्रतिमासृष्टीला आकार देण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत असल्यामुळे त्यांच्या सर्व संग्रहांतील कविता भावकाव्याचा निरामय ठसा रसिक मनावर उमटवितात तसेच त्यातून एका प्रदीर्घ काव्यप्रवासाची भावकहाणीही प्रकटत जाते.

भूतकाळाच्या जाणिवेला सतत वर्तमानकाळात आविष्कृत करणे हे इंदिरा संत यांच्या कवितेचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. स्त्रीसुलभ साधेपणा, स्वाभाविकता, प्रांजलपणा आणि एक अखंड संवादलय ही त्यांच्या कवितेची अन्य उल्लेखनीय वैशिष्ट्ये होत.

ओवीसदृश अशी रचनापद्धती स्वाभाविक ढंगाने त्या उपयोजितात. त्यांच्या मुक्तकांनाही अंतर्गत बंदिशीचा व ठसकेबाजपणाचा डौल असतो. त्यामुळे वरवर सोपी दिसणारी त्यांची कविता अनुकरणाला अवघड जाते. इंदिराबाईंना अनेक मानसन्मान लाभले. रसिकांच्या प्रेमाबरोबर राजमान्यता लाभली.

शेला, मेंदी व रंगबावरी या काव्यसंग्रहांना राज्य शासनाचे वाङ्मयीन पुरस्कार लाभले तसेच गर्भरेशमी या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला (१९८४). नासिकच्या कुसुमागज प्रतिष्ठानने त्यांना 'जनस्थान' पुरस्कार देऊन सन्मानित केले (१९९५). महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने त्यांना गौरववृत्ती दिली होती. त्यांची राहणी अगदी साधी होती. अखेरची १४ वर्षे त्यांचे बेळगावमध्ये वास्तव्य होते. वृद्धापकाळाने त्यांचे बेळगाव येथे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# सावधान! ९९५ कोटी पासवर्ड हॅक, सेलिब्रिटींचे डिटेल्स लीक

हल्ली सायबर हल्ल्याची प्रकरणे सातत्याने समोर येताना दिसून येत आहे. यातच सायबर हल्ल्याचे आणखीन एक मोठे प्रकरण समोर आले आहे. ज्यामध्ये हॅकर्सनी ९९५ कोटी पासवर्डची चोरी झाली आहे. हे प्रकरण म्हणजे आतापर्यंतचा सर्वात मोठा डेटा लीक मानला जात आहे. या घटनेमुळे सायबर सुरक्षेतील कमकुवतपणा समोर आला असून लोकांची वैयक्तिक माहिती धोक्यात आली आहे.



फोर्ब्सच्या रिपोर्टनुसार, bamaCare नावाच्या हॅकर टीमने ९९५ कोटी पासवर्ड लीक केले आहेत. ही माहिती Rockyou2024 नावाच्या रिपोर्टमधून समोर आली आहे. या रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, हा डेटा लीक ऑनलाइन सर्व्हिससाठी वापरल्या जाणाऱ्या पासवर्डचा सर्वांत मोठा ग्रुप आहे.

या डेटा लीकमध्ये अनेक सेलिब्रिटींच्या वैयक्तिक माहितीचा समावेश असल्याचे रिपोर्टमधून समोर आले आहे. हॅकर्सनी बेकायदेशीरपणे अनेक ऑनलाइन अकाउंट्समध्ये प्रवेश केला आणि पासवर्ड व इतर वैयक्तिक माहिती चोरली. या लीकमुळे अनेक कर्मचाऱ्यांची तसेच सर्वसामान्यांची माहिती उघड झाली आहे. पासवर्ड व्यतिरिक्त, या डेटा लीकमध्ये ईमेल अ‍ॅड्रेस आणि लॉगिनची माहिती देखील समाविष्ट आहे. याचा अर्थ हॅकर्स एखाद्या व्यक्तीची ओळख चोरण्यासाठी किंवा फसवणूक करण्यासाठी या माहितीचा गैरवापर करू शकतात. त्यामुळे या घटनेवरून असे लक्षात येते की, आपला वैयक्तिक डेटा किती असुरक्षित आहे?

सायबर सुरक्षेच्या या मोठ्या घटनेनंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) सर्व उच्च शिक्षण संस्थांकडून सायबर सुरक्षेची काळजी घेण्यासाठी काय पावले उचलली आहेत, याची माहिती मागवली आहे. याशिवाय गृहमंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांचे सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण करण्यासाठी जनजागृती मोहीम राबवली जात आहे.

पासवर्ड सुरक्षतेसाठी काय करावे?

मजबूत पासवर्ड वापरा : लहान आणि साध्या पासवर्डऐवजी लांब आणि गुंतागुंतीचे पासवर्ड तयार करा. पासवर्ड नियमितपणे बदला : तुमचा पासवर्ड वेळोवेळी बदला. टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन वापरा : यामुळे तुमच्या अकाउंट्सची सुरक्षा वाढते. सायबर सुरक्षेबद्दल जागरूकता वाढवा : सायबर गुन्ह्यांबद्दल माहिती आणि जागरूक रहा.

# चतुरस्त्र चित्रपट अभिनेते निळू फुले



## निमित्त

मराठी चित्रपटात खलनायक म्हटले की निळू फुले हे समीकरणच जणू झाले होते, एक उत्तुंग खलनायकी छटा असलेले व्यक्तिमत्व त्यांनी पडद्यावर घडवले. त्यांचा जन्म पुण्यामध्ये १९३० साली झाला. नाव नीळकंठ होते तरी निळूभाऊ म्हणूनच ते ओळखले जात.

घरची आर्थिक स्थिती बेताची त्यामुळे म्यॅट्रिकपर्यंत शिक्षण घेऊन पुढे लष्करी विद्यालयात माळीकाम करू लागले जो त्यांचा पिढीजात व्यवसाय होता. त्या कामाचे मासिक ८० रुपये पगार त्यांना मिळे, त्यातील दहा रुपये ते सेवादलाच्या कार्यासाठी देत. त्यांना समाजकारणाची विशेष आवड होती. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यातही ते सक्रिय होते. त्यांना वाचनाची आवड होती, टागोरांच्या साहित्याचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता.राष्ट्रीय सेवादलाचे कार्यकर्ते ही होते. सेवादलाच्या कलापथकासाठी त्यांनी 'येऱ्या गबाळ्याचे काम नोहे' हा वग लिहिला होता. पु. ल. देशपांडे लिखित 'पुढारी पाहिजे' मधील रोंगे आणि , 'कथा अकलेच्या कांद्याची'मधील भूमिकेमुळे त्यांचे नाव झाले. आणि त्यानंतर 'एक गाव बारा भानगडी' हा त्यांचा पहिला मराठी चित्रपट त्यातील झेले अण्णाच्या भूमिकेमुळे निळू फुलेंचे नाव झाले. सखाराम बाईंडर, सूर्यास्त, जंगली कबुतर सारखी नाटकेंही त्यांनी केली त्यानंतर त्यांची घोडदौड चालू झाली. निळू फुलेंच्या वाट्याला खलनायकी भूमिका जास्त आल्या, त्यांचा खलनायकी भूमिकेतील चेहरा डोळ्यासमोर उभा राहतो.

डोक्यावर सावकारी किंवा गांधी भूमिकेनुसार बदललेली टोपी, पांढरा झब्बा/सदरा, धोतर असा वेष, आणि भारदस्त, घोगरा समोरच्यावर जरब बसवणारा आवाज, भेदक नजर यामुळे त्यांचा खलनायक अगदी खरा वाटायचा इतके की, पूर्वी थिएटरमधून चित्रपट पाहून बाहेर पडताना स्त्रीवर्ग त्यांना शिव्याशाप देतच बाहेर पडे. त्यामुळे खेडोपाडी कार्यक्रमासाठी गेले की शिक्षिका, तेथील गावकरी स्त्रिया त्यांना घाबरून दूरच राहत. 'बाई वाड्यावर या' हे त्यांच वाक्य त्यांच्यासाठीच अधोरेखित झाले. अगदी त्यावरून मराठी गाणेही प्रसिद्ध झाले. 'ह्ऱ्या नाऱ्या झिंदाबाद' मधील दिसं म्हातारी परि हाय तरणी कशी नखऱ्यात चाललिया गिरणी हे त्यांच्यावर चित्रित झालेले गाणं प्रसिद्ध होते, सरला येवलेकर नायिकेच्या भूमिकेत होत्या. 'थापाड्या' या चित्रपटातही विनोदी नायकाची भूमिका त्यांनी केली.

सिंहासनमधील हिंदुराव पाटील, सामनातील पत्रकार त्यांच्या बोलक्या हसण्यातूनच चित्रपट संपतो. जणू गलिच्छ राजकारणाला मारलेली चपराक, पिंजरामधील छोटीशी भूमिकाही जबरदस्त वठवली, मास्तरांच्या वेषातील डॉ. श्रीराम लागूंशी उपहासात्मक हास्य करतात त्यात सारे आले. बन्या बापू, सतीची पुण्याई, भालू, हळदी कुंकू, जैत रे जैत, भुजंग, शापित, आणि अशा अनेक चित्रपटात भूमिका करताना प्रत्येक चित्रपटातील त्यांचा खलनायक वेगळा वाटतो. मग ती भूमिका सरपंच, सावकार, पाटील, राजकारणी, असो तो धूर्त कावेबाजपणा, दुष्टपणा त्यांच्या चेहऱ्यावरील हावभाव, बेरक्या नजरेतून, आवाजाची विशिष्ट शैली यातून अगदी हुबेहूब साकारत. सारांश, कुली, मशालसारखे हिंदी चित्रपटही त्यांनी केले.

पडद्यावर त्यांनी खलनायकीपणा साकारला तरी व्यक्तिगत जीवनात मात्र ते अगदी शांत प्रवृतीचे होते, वाचनाची विशेष आवड होती. झब्बा, पायजमा आणि खांद्यावर झोळी हा त्यांचा साधा पेहराव असे. गोष्ट छोटी डोंगराऐवढी हा त्यांनी काम केलेला शेवटचा चित्रपट होता. अश्या ह्या खलनायकी भूमिकांवर आपली छाप उमटवलेल्या निळू फुले यांचे १३ जुलै २००९ ला निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : दमदार पावसाने भातशेती छान फुलली आहे. यामुळे शेतकरीराजा सुखावला आहे.**

## आरोग्य प्रहर

# पाणी पिण्याच्या 'या' चुकीच्या पद्धतींनी होऊ शकतात आजार

पाणी हा जीवनाचा आधार आहे. आपल्या आरोग्यासाठी पाणी पिणे किती महत्त्वाचे आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे, पण तुम्हाला माहीत आहे का की पाणी पिण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे तुम्ही आजारी पडू शकतात? अनेकदा आपण पाणी पिण्याच्या पद्धतीबाबत निष्काळजी असतो, ज्याचा आपल्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.



पाणी पिण्याच्या चुका ज्यामुळे तुम्ही आजारी पडू शकता: १. एकाच वेळी जास्त पाणी पिणे: एकाच वेळी जास्त पाणी पिणे शरीरातील पाण्याचे संतुलन बिघडू शकते. यामुळे डोकेदुखी, उलट्या, चक्कर येणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

२. अन्न खाल्ल्यानंतर लगेच पाणी पिणे : अन्न खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचनक्रिया मंदावते आणि पोटात जडपणा येतो.

३. थंड पाणी पिणे : थंड पाणी प्यायल्याने पचनसंस्थेमध्ये समस्या उद्भवू शकतात आणि पोटदुखी, अपचन आणि गॅसची समस्या होऊ शकते.

४. गरम पाणी पिणे : खूप गरम पाणी प्यायल्याने घशाची जळजळ आणि अल्सर होऊ शकतात.

५. प्लास्टिकच्या बाटलीत पाणी ठेवणे : प्लास्टिकच्या बाटलीत पाणी ठेवल्याने प्लास्टिकचे कण पाण्यात मिसळतात, जे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात.

६. घाणेरडे पाणी पिणे: घाणेरडे पाणी पिल्याने अतिसार, टायफॉइड, कॉलरा इत्यादी अनेक आजार होऊ शकतात.

पाणी पिण्याची योग्य पद्धत :

१. पाणी हळूहळू प्या : लहान घोटात पाणी प्या, जेणेकरून शरीर ते सहजपणे शोषू शकेल. २. जेवल्यानंतर अर्ध्या तासाने पाणी प्या : जेवण केल्यांनतर अर्ध्या तासाने पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. ३. थंड पाणी कमी प्या : कमी थंड पाणी प्या आणि सामान्य तापमानाचे पाणी प्या. ४. कमी गरम पाणी प्या : खूप गरम पाणी पिणे टाळा. ५. काचेच्या किंवा स्टीलच्या बाटल्यांमध्ये पाणी ठेवा: प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये पाणी ठेवणे टाळा. काचेच्या किंवा स्टीलच्या बाटलीत पाणी ठेवा. ६. उकळलेले पाणी प्या: घाणेरडे पाणी उकळून प्या, त्यामुळे त्यात असलेले हानिकारक बॅक्टेरिया नष्ट होतात.

पाणी पिण्यातील चुका तुम्हाला आजारी बनवू शकतात, त्यामुळे या चुका टाळा आणि पाणी पिण्याच्या योग्य पद्धतीचा अवलंब करा.

# रोह्यात विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप, भारतीय जनता युवा मोर्चा तसेच आयटीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा तालुक्यातील तब्बल २३७ विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पार पडला.

या कार्यक्रमात रंजना म्हात्रे, राकेश कौशल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भाजप दक्षिण रायगड सरचिटणीस महेश मोहिते व असिस्टंट जनरल मॅनेजर सुकेश नगरकर यांची कार्यक्रमास विशेष उपस्थिती होती.

रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी सांगितले की, आता दहावी व बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडे करिअरचे अनेक पर्याय असतात. ज्या विद्यार्थ्यांना कमी मार्क आहेत त्यांच्यासाठी हे मार्क आयुष्याच्या यशाचे गणित ठरवत नाही. सरचिटणीस महेश मोहिते यांनी आपल्या आयुष्यातील खडतर प्रवासाच्या आठवणींना उजाळा दिला. आता तुम्ही जे श्रम कराल त्याचे रूपांतर हे भविष्यात मोठ्या यशात होणार आहे, असे सांगितले, तर युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर यांनी, सोशल वर्क, पोलिटिकल सायन्स या शिक्षणाकडे गांभीर्याने पहायचे आवाहन केले.

या वेळी दक्षिण रायगड उत्तर सेल जिल्हाध्यक्ष सनलकुमार, एस.व्ही.एज्युकेशनचे विज्ञान सर, भाजप उपाध्यक्ष रवींद्र तारू, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, अनिल खंडागळे, रवींद्र मामलुस्कर, महिला मोर्चा सरचिटणीस रिया कासार, दक्षिण रायगड युवा वॉरिअर्स जिल्हाध्यक्ष वैभव कुळकर्णी, सुमित रिसबूड, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.




CIDCO
WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.
# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## NOTICE

[UNDER SECTION 68(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966]

**Town Planning Scheme No. 12 (TPS-12)**

No. CIDCO/NAINA/TPS-12/ Draft Scheme/2024/105, dated 8th July 2024

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12, dated 10th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27th April, 2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, under Section 31(1) of the said Act, and vide Notification No. TPS. 1215/245/C.R. 332/16/EP/UD-12, dated 1st March, 2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1717/MIS-2750/C.R.91/2019/UD-12, dated 16th September, 2019 has sanctioned the Development Plan (DP) for 151 villages of NAINA and also vide Notification no. TPS. 1221/1041/C.R.71/21/UD-12, dated 24th June, 2022 and Notification No. TPS-1221/1041/C.R.71/21/EP-29/UD-12, dated 26th July, 2023 has partly sanctioned the Excluded Parts of the DP under section 31(1) of the said Act;

And whereas, as per Section 60(1) of the said Act, CIDCO's Board vide Resolution No 12551, dated 2nd April, 2022 had delegated Managing Director, CIDCO (hereinafter will be referred to as "VC&MD") the powers to get the schemes declare its intention. In accordance with the powers delegated by CIDCO Board, VC&MD vide CIDCO/CP (NAINA)/TPS-12/2022/E-148162 dated 22nd September, 2022 has accorded approval for declaration of intention for making of Town Planning Scheme no. 12 under Section 60(1) of the said Act at part of villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Chinchavali tarf Waje, Kondale, Mahalungi, Morbe, Ritghar, Umroli, Usarli Bk. and Vakadi of Taluka Panvel, District Raigad and a notice about declaration of making TPS-12 as per provision in Section 60(2) of the said Act, has been published in the Extraordinary official Maharashtra Government Gazette (part-II) dated 14th October, 2022 as well as in the daily newspapers "Ram Prahar" and "The Free Press Journal" on dated 19th October, 2022;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No टीपीएस-१२१९/१५२४/प्र.क्र.६४/ १९/नवि १२ dated 30th December, 2019 and 28th February, 2024 has sanctioned the suspension of certain regulations of Development Control and Promotion Regulations of Development Plan of NAINA corresponding to proposed special DCR of TPS-12 in accordance with section 59(1)(b)(iii) of the Act for the proper carrying out of the scheme.

And whereas, after conducting owners meet on 5th and 6th April, 2023 with an extension till 18th April, 2023, as per Rule No. 4(1) of Maharashtra TPS Rules, 1974 by calling all the land owners for discussion and after incorporating suggestions received from the owners, consultation was sought vide submission dated 10th July 2023 from the Director of Town Planning, GoM, as per section 61(1) of the said Act and as per rule no. 4(2) of TPS Rules, 1974;

And whereas, as per Section 61(1) of the said Act, the Planning Authority shall, in consultation with the Director of Town Planning, make a draft scheme for the area in respect of which the declaration was made, and publish a notice in the *Official Gazette* within nine months or within the extended period from the date of the declaration;

And whereas, the Joint Director of Town Planning, Konkan division vide Order No TPS No 12/NAINA/Sect 61(3)/Time-limit Extension/JTDP-KDN/1885, dated 28th June, 2023 has granted extension of three months' time i.e. up to and inclusive of 13th October, 2023 for making and publication of the said draft scheme;

And whereas, the Director of Town Planning vide letter जा.क्र.वि.यो.नैना/नरयो क्र. १२/कलम ६१(१)/प्र.क्र. ३४८/२३/टिपीव्ही-३/५१४९ dated 3rd October, 2023 had offered consultation on TPS-12 and also accorded approval for suitable amendment in the sanctioned DP reservation while making provisions in a draft TPS-12 as per provisions of section 59(2) of the said Act.

And whereas, necessary changes suggested by Director of Town Planning in the consultation have been incorporated in the draft TPS-12.

And whereas, in accordance with provisions of section 61(1) of the said Act, a Notice of making draft TPS-12 had been published in extraordinary official Maharashtra Government Gazette (part-II) dated 11th October, 2023 and in local newspapers "Raigad Nagri" and "The Free Press Journal" on dated 17th October, 2023 for inviting suggestions/objections within one month of notice in accordance with the provisions of section 67 of the said Act.

And whereas, the Government of Maharashtra in exercise of powers conferred by sub-section (1) of section 151 of the Said Act, vide Notification No TPS-1817/973/CR-103/17/UD-13 dated 13th September 2017 had delegated the powers exercisable by it under section 68(2) of the said Act to Managing Director, CIDCO (hereinafter will be referred to as "VC&MD").

And whereas, after incorporating necessary changes as per suggestions received, the draft scheme has been submitted to VC&MD for sanction in accordance with section 68(1) of the Said Act on 1st Jan, 2024.

And whereas, in accordance with sub-section (2) of section 68 of the Said Act, VC&MD has sought consultation of Director of Town Planning, Maharashtra State on 2nd Jan, 2024 prior to sanction of Draft Scheme.

And whereas, the Director of Town Planning vide letter No जा. क्र. नरयो क्र. 12(प्रा.)नैना/कलम 68(1)/प्र.क्र. ८१/ २४/टीपीव्ही-३/१६९८ dated 15 March, 2024 had given his consultation for sanction of Draft TPS-12.

And whereas, in accordance with the provisions of section 148(A) of the said Act, in computing the period in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period or periods during which any action could not be completed under the said chapters due to enforcement of any Code of conduct by the Election Commission of India or the State Election Commission in respect of any election shall be excluded.

And whereas, Model Code of Conduct by the Election Commission of India in respect of general election to Lok Sabha was made applicable with effect from 16th March 2024 and further extended by the notification of 6th June, 2024 for State Legislative Council Election of Post-Graduate Constituency Konkan Division till the completion of the election i.e 5th July 2024 as per Election Commission of India, Press Note dated 24th May, 2024, the said time period is excluded under section 148-A of the said act.

Therefore, now in accordance with the powers delegated to me by the State Government vide Notification dated 13th September 2017, the **Draft Town Planning Scheme No 12 (TPS-12)** at part of Villages Chinchavali tarf Waje, Kondale, Mahalungi, Morbe, Ritghar, Umroli, Usarli Bk. and Vakadi of Taluka Panvel, District Raigad is hereby sanctioned under section 68(2) of the MR&TP Act, 1966 along with corresponding Special Development Control Regulations.

A copy of the draft TPS-12 scheme book, plans thereof along with corresponding Special DCRs are made available for inspection by the public during office hours on all working days in the office NAINA, 8th floor, Tower No 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400614 in accordance with sub-section (3) of section 68 of the Said Act. The same is also uploaded on website of CIDCO i.e. https://cidco.maharashtra.gov.in//naina and further can be obtained on payment of prescribed fees.

Place: Navi Mumbai

Date : 8/7/2024

Regd. Office: Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai-400021.

**Vijay Singhal**
**Vice Chairman & Managing Director,**
**CIDCO**

## सूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना
अधिनियम १९६६ च्या कलम ६८ च्या उपकलम (२) नुसार
**नगररचना परीयोजना क्रमांक १२ (टीपीएस – १२)**
क्र. सिडको/नैना/ न.र.यो. १२/ प्रा.यो./२०२४/१०५, दिनांक ८ जुलै, २०२४

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस–१७१२/४७५/प्र.क्र.–९८/१२/नवि–१२ दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस –१२१५/२४५/सीआर –३३२/२०१५/एस.एम./यूडी –१२, दिनांक २७ एप्रिल, २०१७ नुसार अधिनियमाच्या कलम ३१(१) नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि–१२ दिनांक ०१ मार्च, २०१९ अन्वये अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहेत;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस –१७१७/ एमआयएस २७५०/सीआर – ९१/२०१९/यूडी –१२, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ नुसार नैनातील १५१ गावांसाठी विकास आराखडा मंजूर केला आहे आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२२१/१०४१/ प्र.क्र. ७१/ २१/ नवि –१२ दिनांक २४ जून २०२२ व अधिसूचना क्र. टीपीएस–१२२१/ १०४१/ प्र.क्र.७१/२१/ ईपी. २९/ नवि–१२ दिनांक २६ जुलै, २०२३ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप–कलम (१) नुसार विकास आराखड्याचा वगळलेले भाग अंशतः मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२५५१ दिनांक २ एप्रिल, २०२२ अन्वये नगर रचना परीयोजना करण्याचा उद्देश घोषित करण्याचे कलम ६० च्या उप–कलम (१) नुसार अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना दिले आहे;

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक २ एप्रिल, २०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून क्र. सिडको/नैना/२०२२/ E–१४८१६२ द्वारे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी, पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील मौजे चिंचवली तर्फे वाजे, कोंडले, महाळुंगी, मोर्बे, रीटघर, उमरोली, उसर्ली बु. आणि वाकडी गावांच्या काही भागात उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप–कलम (१) नुसार नगररचना परीयोजना क्र. १२ करण्याचा उद्देश घोषित केला आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप–कलम (२) खालील सुचना दि. १४ ऑक्टोबर, २०२२ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग २ यामध्ये व दि. १९ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या मराठी दैनिक रामप्रहर व द फ्री प्रेस जर्नल या इंग्रजी वृत्तपत्रात यात प्रकाशित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परीयोजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उक्त अधिनियमाच्या कलम ५९(१)(ख)(iii) अन्वये महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस–१२१९/२३८२/प्र.क्र.१८६/१९/नवि–१२ दि. ३० डिसेंबर, २०१९ व दि. २८ फेब्रुवारी, २०२४ अन्वये मंजूर विकास योजनेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या काही तरतुदींच्या तहकुबीला मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र न. र. प. नियम १९७४ च्या नियम क्र. ४(१) नुसार दिनांक ५ व ६ एप्रिल, २०२३ रोजी संबंधित जमीन मालकांची सभा आयोजित करून आणि जमीन मालकांकडून मिळालेल्या सूचनांचा समावेश केल्यानंतर दि. १०जुलै, २०२३ रोजीच्या प्रस्त्वान्वाये टीपीएस–१२ चा कच्चा मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार आणि महाराष्ट्र टीपीएस नियम १९७४ च्या नियम क्रमांक ४(२) नुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे कलम ५९(२) अन्वये मान्यता व कलम ६१ (१) अन्वये प्रसिद्धीपूर्व सल्ला मसलतीसाठी पाठविण्यात आला.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार, नियोजन प्राधिकरणाने संचालक, नगर रचना, यांच्याशी सल्लामसलत करून, ज्या योजनेसाठी घोषणा करण्यात आली त्या क्षेत्रासाठी प्रारूप योजना तयार करुन घोषणेच्या तारखेपासून नऊ महिन्यांच्या आत किंवा वाढीव कालावधीत अधिकृत महाराष्ट्र शासन राजपत्रात नोटीस प्रकाशित करावयाची आहे.

आणि ज्याअर्थी, सह संचालक, नगर रचना, कोकण विभाग यांनी आदेश क्रमांक प्रा.न.र.यो.क्र. १२/ नैना/ कलम ६१(३)/ मुदतवाढ/ सहसंकोवि/१८८६ दिनांक २८ जुन, २०२३ अन्वये प्रारूप योजना बनवून प्रकाशित करण्यासाठी तीन महिन्यांचा म्हणजेच दि. १३ ऑक्टोबर २०२३ हा दिवस धरून त्यापर्यंतचा वाढीव कालावधी दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्र जा.क्र.वि.यो.नैना/नरयो क्र. १२/कलम ६१(१)/प्र.क्र. ३४८/२३/टिपीव्ही–३/५१४९ अन्वये टीपीएस –१२ बाबत सल्लामसलत दिली आहे. तसेच टीपीएस –१२ बनवताना मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावांमध्ये झालेल्या बदलांना उक्त अधिनियमाच्या कलम ५९(२) अन्वये मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, नगररचना संचालकांनी सल्लामसलत करताना सुचवलेले आवश्यक बदल टीपीएस –१२ मसुद्यात समाविष्ट करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार, टीपीएस –१२ मसुदा तयार करण्याची सूचना असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासन राजपत्रात (भाग–II) दिनांक ११ ऑक्टोबर २०२३ रोजी दैनिक स्थानिक वृत्तपत्र रायगड नगरी आणि द फ्री प्रेस जर्नल मध्ये दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी प्रकाशित करून, उक्त अधिनियमाच्या कलम ६७ मधील तरतुदींनुसार एक महिन्याच्या आत सूचना/आक्षेप मागविण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम १५१ च्या उप–कलम (१) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १३ सप्टेंबर २०१७ रोजीच्या अधिसूचना क्रमांक टीपीएस –१८१७/ ९७३ / सीआर–१०३/१७/ नवि–१३ अन्वये त्यांच्यातर्फे कलम ६८(२) अंतर्गत वापरण्यात येणारे अधिकार सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांना प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, प्राप्त झालेल्या लेखी आक्षेप विचारात घेऊन त्याप्रमाणे आवश्यक बदल समाविष्ट केल्यानंतर, प्रारूप योजना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना उक्त अधिनियमाच्या कलम ६८(१) नुसार दि १ जानेवारी, २०२४ रोजी मंजुरीसाठी सादर करण्यात आली.

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी दि २ जानेवारी, २०२४ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उप–कलम (२) नुसार, प्रारूप योजना मंजूर करण्यापूर्वी संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य यांची सल्लामसलत मागितली आहे.

आणि ज्याअर्थी संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य यांनी दि १५ मार्च, २०२४ रोजीचे पत्र. जा. क्र. नरयो क्र. १२ (प्रा.) नैना/ कलम ६८(१)/प्र.क्र. ८१/ २४/टीपीव्ही–३/१६९८ पत्रान्वये उक्त अधिनियमाच्या कलम ६८च्या उप–कलम २ अन्वये प्रारूप नगर रचना परियोजना –१२ मंजुरी बाबत सल्लामसलत दिली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन रचना अधिनियम द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८ (अ) मधील तरतुदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतुदीप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठी कालावधी विचारात घेतांना, भारत निवडणूक आयोग किंवा राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या संदर्भात आचारसंहितेची अंमलबजावणीमुळे, उक्त प्रकरणानुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकली नसेल तर, असा कालावधी वगळणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, भारताच्या निवडणूक आयोगाकडून लोक सभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता लागू असलेला आदर्श आचारसंहिता कालावधी दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी लागू करण्यात आला व तो ६ जून, २०२४ च्या अध्यादेशानुसार विधान परिषद कोंकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीकरिता दिनांक २४ मे, २०२४ च्या प्रेस नोट द्वारे नमूद निवडणूक संपेपर्यंत म्हणजेच दिनांक ५ जुलै, २०२४ पर्यंत वाढविण्यात आला, सदर कालावधी उक्त अधिनियमाच्या कलम १४८–अ अन्वये वगळण्यात आला आहे.

म्हणून, आता या अधिसूचनेद्वारे, दि १३ सप्टेंबर २०१७ च्या अधिसूचनेअन्वये राज्य सरकारद्वारे मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील मौजे चिंचवली तर्फे वाजे, कोंडले, महाळुंगी, मोर्बे, रीटघर, उमरोली, उसर्ली बु. आणि वाकडी गावांच्या काही भागात येथे एकसंलग्न अशा **प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक १२ (टीपीएस –१२)** त्यासोबतच्या विशेष विकास नियंत्रण नियमावलीसह उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या पोटकलम (२) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उपकलम (३) नुसार मंजूर प्रारूप टीपीएस –१२ योजनेची प्रत संबंधित विशेष नियंत्रण नियमावलीसह नैना कार्यालय, ८ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे कार्यालयीन कामकाजाच्या सर्व दिवशी नागरीकांच्या अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे. तसेच प्रारूप टीपीएस –१२ सिडकोचे संकेतस्थळ https://cidco.maharashtra.gov.in//naina येथेसुद्धा अपलोड केली गेली आहे आणि विहित शुल्क भरल्यानंतर देखील मिळू शकते.

स्थळ : नवी मुंबई
दिनांक : ८/०७/२०२४
नोंदणीकृत कार्यालय: निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०००२१

**विजय सिंघल**
**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,**
**सिडको**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**CIDCO/PR/094/2024-25**

# रायगडातील आरोग्य यंत्रणा सुदृढ करणार -डॉ. अंबादास देवमाने



**रायगडातील ग्रामीण भागात चांगल्या आरोग्य सुविधा निर्माण करून तेथील जनतेला चांगले उपचार मिळावेत यासाठी प्रयत्न करीत आहे. दोन वर्षामध्ये आरोग्ययंत्रणा सुदृढ करण्याकडेच आमचे प्राधान्य असेल, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी सांगितले. आजच्या 'रामप्रहर'च्या संवादप्रहर सदरात त्यांच्याशी संवाद साधून आरोग्यसेवेबाबत त्यांच्या योजना जाणून घेणार आहोत...**

रामप्रहर संवादप्रहर

**१. जिल्ह्याच्या शल्यचिकित्सकपदाची सूत्रे आपण स्वीकारल्यानंतर कशाला प्राधान्य दिले?**

इर्शाळवाडी येथील दुर्घटना घडली त्याच्या आदल्या दिवशी मी रायगडच्या जिल्हा शल्यचिकित्सकपदाची जबाबदारी स्विकारली होती. या दुर्घटनेत बरेच लोक जखमी झाले होते. त्यांच्यावर उपचार करण्याची जबाबदारी आली होती. ती जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली. त्यानंतर जिल्ह्यातील आरोग्य सुविधांबाबतचा आढावा घेतला. रायगड जिल्हा भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक आहे. येथील आरोग्यविषक बाबीदेखील तितक्याच आव्हानात्मक असल्याचे समजले. या जिल्ह्यात आरोग्यविषयक खूप काही करण्यासारखे आहे. जर आरोग्ययंत्रणा सक्षम केली, तर लोकांना भरपूर फायदा होईल, हे लक्षात आले. त्यामुळे या जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सृदृढ करण्याला मी प्राधान्य दिले आहे. त्या दृष्टीने प्रयत्न केले.

**२. रुग्णालयातील वातावरण बदलण्यासाठी काय उपाययोजना केल्या?**

रुणांना चांगल्या सुविधा देत असताना त्यांच्याशी आदराने वागणेदेखील तितकेच महत्त्वाचे असते. हे रुग्णालयामधील डॉक्टर, परिचारिका तसेचे इतर कर्मचाऱ्यांनादेखील सामजावून सांगितले. ही सेवा आहे, ती मनापासून करायची असते. कुणावर जबरदस्ती करून हे काम करता येणार नाही. सर्व सहाकरी डॉक्टरांना प्रोत्साहन दिले. त्याचे चांगले परिणाम दिसत आहेत.

**३. कोरोना काळात सर्व रुग्णालयांमध्ये केवळ कोरोना रूग्णांवरच उपचार केले जात होते. ही परिस्थिती कशी बदलली?**

कोरोनाच्या काळात सर्व सरकारी रुग्णालये कोरोनाबाधित रूग्णांसाठी वापरली जात होती. इतर आजारांच्या रूग्णांवर उपचारच होत नव्हते. त्यानंतर रुग्णालये पूर्वपदावर आणणे गरजेचे होते. इतर रूग्णांना उपचार मिळणे आवश्यक होते. त्यामुळे सर्व शासकीय रुग्णलयांमध्ये सर्व रूग्णांना उपचार देण्याचे सुरू करून ही रुग्णालये पूर्वपदावर आण्याचे प्रयत्न केले. सर्व रूग्णांना उपचार मिळू लागले.

**४. ग्रामीण भागातील रूग्णांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी कोणते प्रयत्न केले?**

पूर्वी रुग्णालयात येण्यास ग्रामीण भागातील लोकांना भीती वाटत होती. यासाठी रुग्णालयांध्ये आनंदी वातावरण असावे, सर्व रुग्णालयांध्ये स्वच्छता राखण्याच्या सूचना दिल्या. ग्रामीण भागातील रुग्णालये सुस्थितीत आणली. बालमृत्यू कमी करण्यासाठी प्रयत्न केले. श्रीवर्धन, माणगाव डायलेसीस केंद्र सुरू केले. माणगाव येथे सिटीस्कॅन सुविधा उपलब्ध करून दिली.




**५. ग्रामीण रुग्णलयांची परिस्थिती कशी आहे?**

जिल्ह्यातील काही रुग्णालयांच्या दुरूस्तीला मान्यात मिळवून घेण्यात आल्या आहेत. महाड येथे २०० खाटांचे सुपर स्पेशालिस्ट रुग्णालयही मंजूर झाले आहे. उरण येथे चांगले हॉस्पिटल उभारण्यात येणार आहे. पाली, खालापूर येथे ग्रामीण रुग्णलयाचे काम सुरू केले. माणगाव, महाड, श्रीवर्धन, पेण, पनवेल, खालापूर या तालुक्यांमधील दुर्गम भागातील लोकांना तेथेच उपचार मिळाले पाहिजेत यासाठी त्या भागातील रुग्णालये सुसज्ज करण्यात येणार आहेत. लवकरच रोहा तालुक्यात महिला रुग्णालय सुरू करण्यात येणार आहे.

**६. डॉक्टर नसल्यामुळे रूग्णांना उपचारासाठी मुंबई, पुण्यात जावे लागते. यासाठी काही विशेष उपाययोजना?**

जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टर कमी होते. रूग्णांना मुंबईत जावे लागत होते ही वस्तूस्थिती आहे. शस्त्रक्रिया होत नव्हत्या, मात्र आता डॉक्टर उपलब्ध आहेत. रूग्णांवर चांगले उपचारदेखील होत आहेत. मी स्वतः सर्जन असल्यामुळे शस्त्रक्रिया करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यामुळे इतरही डॉक्टर शस्त्रक्रिया करू लागले. आता जिल्हा रुग्णालयात बऱ्यापैकी शस्त्रक्रिया होत आहेत. तज्ज्ञ डॉक्टारांशी संपर्क साधला. खासगी डॉक्टरही येऊ लागलेत. त्यामुळे रूग्णांना चांगल्या सुविधा मिळत आहेत. कॅन्सरवरदेखील उपचार होत आहेत. रायगड मेडिकल असोसिएशनच्या सहाकार्याने एक शिबिर आयोजित करून काही रूग्णांवर प्लास्टिक सर्जरी केली. महात्मा फुले योजनेची अंमलबाजावणी केली. शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. डीपीडीसीकडून शासन यांच्याकडून निधी मिळतो आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणा सुधारत आहे. हळूहळू परिवर्तन होत आहे. जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सुदृढ करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री, जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी प्रयत्नशील आहेत. जिल्हाधिकारी, रजिपचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचेदेखील चांगले सहकार्य मिळत आहे.

**७. इतर जिल्ह्याच्या तुलनेत रायगडात आरोग्य यंत्रणेची परिस्थिती कशी आहे?**

आपला जिल्हा क्षेत्रफळाने मोठा आहे. भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक आहे. इतर जिल्ह्यांची आणि येथील परिस्थिती वेगळी आहे. तरीदेखील आम्ही आरोग्याच्या चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. इतर जिल्ह्यांपेक्षा चांगल्या सुविधा आपल्या जिल्ह्यात मिळाव्यात, असाच आमचा प्रयत्न आहे.

**८. जिल्ह्यातील कंपन्यांची मदत होते का?**

नक्कीच.. जिल्ह्यातील कंपन्यांची वेळोवेळी मदत होत असते. त्यांच्या सीएसआर निधीतून विविध यंत्रणा सक्षम करण्यास मदत झाली आहे. ओएनजीसीने डेंटल युनिटसाठी मतद केली. शस्त्रक्रीया यंत्र दिले. गेलने मदत केली. जेएसडब्ल्यूने कंपाऊंड वॉल, अंतर्गत रस्ते बांधण्यास मदत केली. आरसीएफ, रिलायन्स यांनी मदत केली. सीएसआर निधी मिळवून चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न केला.

**९. जिल्हा रुग्णालयाची जुनी इमारत पाडणार का?**

समुद्रकिनारी असलेल्या इमारतींचे आयुष्य कमी असते. अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयाची इमारत ४० वर्षे जुनी आहे. तिचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे. या इमारतीचे मजबुतीकरण केले जात आहे. रुग्णलयात सुमारे २५० रूग्ण ॲडमिट असतात. दररोज १००० बाह्यारूग्ण येता. त्यांना दुसरीकडे हलविणे करणे शक्य नाही. नवीन इमारत बांधून जुनी इमारत टप्प्याटप्प्याने रिकामी केली जाईल. त्यानंतर जुनी इमारत पाडण्यात येईल. नवीन इमारतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्याल मंजुरी मिळाली आहे. सध्या २०० खाटांचे रुग्णालय आहे. आता ३०० खाटांचे नवीन रुग्णालय बांधण्यात येणार आहे.

जिल्हा रुग्णालयात ऑक्सिजन प्लांट ते नेत्र रुग्णालय परिसरात भव्य अशी ३०० बेडची अद्यावत रुग्णालय इमारत उभारणीस मंजूर मिळाली आहे. यासाठी १५० कोटी खर्च होणार आहे. सातमजली इमारत बांधली जाणार आहे. केंद्राच्या नियमानुसार पब्लिक हेल्थ सेंटरच्या मान्यतेनुसार खाजगी पद्धतीचे अद्यावत असे बांधकाम केले जाणार आहे. ३०० बेडसह २० बेडचे वेगळे आयसीयू कक्ष असणार आहे. १६ बेडचे नवजात बालकक्ष, २० बेडचे डायलेसीस सेंटर, रूग्ण थांबा कक्ष, अपघात विभाग तसेच अपघात विभागात वेगळे शस्त्रक्रिया कक्षही उभारले जाणार आहे. इमारतीत पाच मोड्युलर अद्यावत असे यंत्र सामुग्रीसह शस्त्रक्रिया कक्ष ही बांधले जाणार आहेत. यामध्ये अथम, अर्थो, जनरल, स्त्री रोग शस्त्रक्रिया कक्ष असणार असून एचआयव्ही, एचएसबी बधितांसाठीही वेगळे शस्त्रक्रिया कक्ष असणार आहे. याशिवाय लॉंड्री, पाककक्ष, क्ष-किरण कक्ष, चार लिफ्ट, दोन जिने, एक रॅम्प अशी सुविधा इमारतीमध्ये असणार आहे.

**(शब्दांकन : प्रकाश सोनवडेकर)**



## निवडक



### शाळेमध्ये रस्ता सुरक्षा मार्गदर्शन

**खारघर :** विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच वाहतूक नियमांची माहिती व्हावी यादृष्टीने खारघर वाहतूक शाखा हद्दीतील गोखले स्कूल सेक्टर १२ या शाळेत खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एस. एस. काणे यांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. ट्रॅफिक अवेअरनेस कार्यक्रम घेऊन आरएसपी व इतर अशा ८६ विद्यार्थी व ७८ विद्यार्थिनी अशा एकूण १६४ विद्यार्थ्यांना आम्ही वरिष्ठ पोलीस निरीक्षक एस. एस. काणे खारघर वाहतूक शाखा यांनी स्टाफसह वाहतुकीच्या नियमांबाबत माहिती देऊन वाहतुकीचे नियम पाळणेबाबत आवाहन केले. या वेळी काणे यांनी विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तराद्वारे संवाद साधला. वाहतूक नियमांविषयी प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी काही प्रश्नांची उत्तरे बरोबर, तर काही चुकीची दिली. चुकीच्या उत्तराबाबत काणे यांनी मार्गदर्शन केले.

### डिझेल चोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकमधील ३०० लिटर डिझेल चोरुन नेल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०५ (सी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. जंगबहादूर सिंह हे अशोक लेलँड कंपनीचा ट्रक (यूपी ७८ एचएन २३७२)वर चालक म्हणून काम करतात. ते रिलायन्स कंपनी पाली येथून माल भरून कानपूर येथे जाण्यासाठी निघाले. मध्यरात्री नायरा पेट्रोल पंप तारागाव येथे आले असता, त्याला झोप लागली व त्याने रस्त्याच्या कडेला पनवेल बाजूकडील लेनवर ट्रक उभा केला व ट्रकमध्ये झोपले. पहाटे ३ वाजता उठले असता ट्रक चालू केला. या वेळी डिझेलचा काटा खाली झालेला दिसला. त्यांनी ट्रकमधून खाली उतरून पाहणी केली असता ट्रकच्या डिझेल टाकीचे झाकण तोडलेले दिसून आले. डिझेल चोरून नेल्याची खात्री झाली. २७ हजार रुपये किमतीचे ३०० लिटर डिझेल चोरून नेल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### होंडा ॲक्टिव्हा दुचाकीची चोरी

**पनवेल :** राहत्या घरासमोर उभी करून ठेवलेली १५ हजार रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची होंडा ॲक्टिव्हा दुचाकीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना शहरातील मिरची गल्ली येथे घडली. प्रशांत मानकामे यांनी त्यांची होंडा ॲक्टीव्हा (एमएच ४६ एके ०९६७) ही घराच्या अंगणात उभी ठेवली असता, अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सर्व प्रभागांमध्ये माझी लाडकी बहीण अर्ज नोंदणी कक्ष

## नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आठ विभाग कार्यालयांप्रमाणेच महानगरपालिका वा शासकीय इमारतींमध्ये सर्व प्रभागांत अर्ज नोंदणी कक्ष तत्काळ सुरू करावेत व त्याची यादी नागरिकांच्या माहितीसाठी सर्व प्रसारमाध्यमांतून व्यापक स्वरुपात प्रसिद्ध करावी, असे निर्देश देत नवी मुंबई मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी एकही पात्र महिला लाभ घेण्यापासून वंचित राहू नये याची खबरदारी घ्यावी, असे स्पष्ट निर्देश योजनेच्या आढावा बैठकीप्रसंगी दिले.



महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्याकरिता पात्र महिला या नारीशक्ती दूत ॲपद्वारे स्वत: ऑनलाईन अर्ज भरू शकतात, तसेच ज्या महिलेला ऑनलाईन अर्ज भरता येत नाही त्या महिलांसाठी अर्ज भरण्याची सुविधा महानगरपालिकेने स्थापित केलेल्या विभाग कार्यालयातील विशेष नोंदणी कक्षामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

या नोंदणी कक्षांची संख्या वाढवून प्रत्येक प्रभागात किमान एक असे १११ नोंदणी कक्ष तत्काळ कार्यान्वित करावेत, असे निर्देश आयुक्तांनी या बैठकीत दिले. त्याचप्रमाणे योजनेसाठी पात्र महिलांच्या सुविधेच्या दृष्टीने शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या कक्षांची वेळ सकाळी ८ ते दुपारी २ आणि दुपारी २ ते रात्री ८ अशाप्रकारे २ सत्रात असावी असेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

योजनेकरिता भरण्यात येणारे अर्ज बिनचूक भरावेत व शासन निर्णयात नमूद केलेली पुराव्यांची आवश्यक ती योग्य कागदपत्रे तपासून अपलोड करावीत, असेही निर्देश या वेळी देण्यात आले. एकही पात्र लाभार्थी महिला नोंदणी कक्षातून परत जाणार नाही याची दक्षता घ्यावी व अर्ज भरण्याची संपूर्ण कार्यवाही विनामूल्य होईल याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

अर्जात भरली जाणारी माहिती आधारकार्ड पायाभूत मानून त्यानुसार भरावी व अर्ज भरतानाच तो पूर्णपणे योग्य प्रकारे भरला जाईल याची विशेष काळजी घेण्याची आयुक्तांनी नमूद केले. जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचविण्याच्या दृष्टीने फलक लावण्यात यावेत, हस्तपत्रके वितरीत करावीत, सर्व सोशल माध्यमांचा वापर करावा, अर्ज भरणा सुविधा केंद्रांची यादी जास्तीत जास्त माध्यमांतून प्रसिद्ध करावी तसेच शाळांमध्येही विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती देऊन त्यांच्यामार्फत त्यांच्या घरांपर्यंत योजनेची माहिती पोहचावी यादृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. बालवाडी शिक्षिका/सेविका, आशावर्कर तसेच समाजविकास विभागातील समूह संघटक यांच्यामार्फतही त्यांच्या कार्यक्षेत्रातील घराघरात या योजनेची प्रसिद्धी करावी, अशा सूचना देण्यात आल्या. विभाग कार्यालयांप्रमाणेच शाळा, रुग्णालये याठिकाणीही होर्डिंग, बॅनर्सद्वारे योजनेची प्रसिद्धी करण्याचे सूचित करण्यात आले.

# फेसबुकद्वारे सोन्याच्या बिस्कीटाचे आमिष; सात तोतया पोलिसांना अटक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पोलीस असल्याचा आव आणत एका ज्वेलर्स मालकाची १३ लाखांची लूट करणाऱ्या सात आरोपींना नवी मुंबई गुन्हे शाखेने अटक केली आहे.

सोन्याची बिस्कीटे अत्यंत कमी दराने विकत असून ते खरेदी करण्यासाठी खारघरला येत असल्याचे आरोपीने ज्वेलर्स मालकाच्या मित्राला सांगितले होते. मित्राने ही माहिती मालकाला दिली. पण त्यांच्या हे लक्षात आले नाही की, हा एक सापळा दरोडेखोरांनी त्यांची लूट करण्यासाठी रचला होता. खारघर येथे २६ जून रोजी ही घटना घडली होती.

फिर्यादी रवींद्र चौधरी (वय ५०), त्यांचा मित्र आणि एक कर्मचारी १३ लाख घेऊन सोन्याच्या बिस्किट विक्रीसाठी त्यांच्या कारमधून खारघरला चालले होते. तेव्हा एका एसयूव्हीमधून चार जण पोलीस असल्याचे सांगत त्यांच्याजवळ गेले. कर्मचाऱ्याकडे पैशाची बॅग होती. त्यामुळे दरोडेखोरांनी त्याला कारमधून बाहेर ओढले आणि त्याला त्यांच्या एसयूव्हीमध्ये बसवले. त्यानंतर त्यांनी कर्मचाऱ्याकडून पैशाची बॅग हिसकावून घेतली आणि त्याला गाडीच्या बाहेर फेकून दिले.

नवी मुंबई केंद्रीय गुन्हे शाखेने आरोपींना बुधवारी अटक केली. गुन्हे शाखेने आरोपींकडून एकूण १२,२७,३०० रुपयांचा मुद्देमाल आणि रोख रक्कम हस्तगत केली आहे, तसेच आरोपींनी गुन्हा करण्यासाठी वापरलेली वाहने जप्त केली आहेत.

### रोहिणी बोटेंना पाच लाखांची मदत

**नवी मुंबई :** बेलापूर येथे रेल्वे दुर्घटनेमध्ये पाय गमवावे लागलेल्या रोहिणी राजेश बोटे या महिलेला शिवसेना नवी मुंबई संपर्कप्रमुख किशोर पाटकर यांनी मदतीचा हात दिला आहे. पाटकर यांनी कुटुंबियांची भेट घेऊन उपचारासाठी पाच लाखांची मदत केली.

तळोजा येथे राहणाऱ्या रोहिणी बोटे या रेल्वेने प्रवास करीत असताना सोमवारी बेलापूर येथे चक्कर येऊन रूळावर पडल्या. अपघातामध्ये त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांना उपचारासाठी सीबीडी येथील एमजीएम रुग्णालयात दाखल केले आहे. उपचारासाठी खूप खर्च येणार असल्यामुळे शिवसेना नवी मुंबई संपर्क प्रमुख किशोर पाटकर यांनी त्यांच्या उपचारासाठी पाच लाख रुपये सहकार्य केले आहे. त्यांच्या कुटुंबियांनी पाटकर यांचे आभार मानले आहेत.

# पाताळगंगा रोटरी क्लब अध्यक्षपदी सचिन थोरात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रॉटरी क्लब ऑफ पाताळगंगाचा २०२४-२५वर्षाचा अध्यक्ष पदग्रहण सोहळा कराडे खुर्द येथे झाला. या वेळी रसायनी येथील सचिन थोरात यांची अध्यक्षपदी तर सचिव म्हणून ऋतुजा भोसले यांची निवड करण्यात आली. माजी अध्यक्ष रेश्मा कुरूप व माजी सचिव उचिल यांनी अध्यक्षपदाचा व सचिवपदाचा कार्यभार सचिन थोरात व ऋतुजा भोसले यांना सोपवला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल येथील प्रसिद्ध सर्जन डॉ. गिरीष गुणे व डॉ. दिपक खोत उपस्थित होते.

त्याचप्रमाणे मोहोपाडा सरपंच उमा मुंढे, सुनील भोसले, गणेश काळे, अमित शाह, गणेश म्हात्रे, बाळकृष्ण होनावळे, रोटरीयन खजिनदार देवेंद्र महिंद्रकर, रोटरीयन राजू गायकवाड, शशिकांत शानबाग, रोटरीयन ॲड. प्रथम महिला समिधा थोरात, शारदा काळे, उषा मेणसे, मितल शाह, रेवती गायकवाड, अविनाश गाताडे, गणेश वर्तक, अनुराधा होनावळे, वर्षा पाटील, मनोहर पाटील, शर्विन भोसले, हेमंत थोरात उपस्थित होते.



# कोर्लई येथे रस्त्याचा कठडा ढासळला

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन पावसात कोर्लई चढाव रस्त्याचा संरक्षित कठडा ढासळला. त्यामुळे रस्ता वाहनांसाठी एकमार्ग खुला ठेवण्यात आला आहे, मात्र चढाव रस्ता ढासळला असल्याने तेथून वाहने जा-ये करणे धोकेदायक परिस्थितीचे चित्र दिसते.



मुरूड तालुक्यात पहिला चढाव कोर्लई येथे लागतो. कोर्लई डोंगरातून मुरूडकडे जाणाऱ्या रस्त्याला संरक्षित कठडे बांधण्यात आले होते, पण ऐन पावसाळ्यात डोंगरातील मातीची दरड घसरून चढाव बांधण्यात आलेला संरक्षित कठडा ढासळला. त्यामुळे वाहतुकीस धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. तेथून ढासळलेल्या संरक्षित कठडा परिसरातून एकमार्गी वाहतूक सुरू ठेवण्यात आली आहे, मात्र पावसाचे प्रमाण जास्त झाले तर डोंगरातील रस्त्याच्या बाजूच्या संरक्षित कठडा ढासळून पडलेली दरड आणखी पसरण्याची व कोसळण्याची शक्यता आहे. परिणामी मुरूडकडे जाणारा रस्ता पूर्णतः बंद होण्याची संभावना आहे.

मुरूड तालुक्यातील वाहतुकीचे महत्त्वाचे ठिकाण असलेल्या कोर्लई डोगरांतील रस्ताचा कठडा त्वरित दुरूस्त व नूतनीकरण होणे गरजेचे आहे. नाही तर तालुक्याकडे जा-ये होत असलेली वाहतूक मोठा वळसा घेउन सुपेगावमार्गे करावी लागेल. त्यामुळे प्रवासीवर्गास व वाहनचालकांना त्रासदायक ठरून खर्चिकही होईल.

दरम्यान, रस्ता ढासळसला त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्यकारी अधिकारी सुखदेवे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी गोरे, राठोड यांनी पाहणी केली व ढासळलेल्या संरक्षण भिंतीच्या कठड्याचे त्वरित बांधकाम करण्याचे आश्वासन दिले. या वेळी मनसे पदाधिकारी राजेश तरे यांची उपस्थिती होती.

# रोह्यात एक झाड आईच्या नावे उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील राजिप शाळा पहुर येथे बुधवारी (दि. १०) एक झाड आईच्या नावे या उपक्रमांतर्गत भाजपच्या वतीने विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली. यामध्ये नारळ, आंबा, फणस, चिकू, पेरु, सीताफळ, सोनचाफा, कडीपत्ता, टिकोमा अशा अनेक प्रकारच्या झाडांचा समावेश आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशातील नागरिकांना आवाहन केले होते की, किमान एक झाड आपल्या आईच्या नावे लावा. हा उपक्रम कशासाठी, त्याचे नेमके उदिष्ट काय होते हे भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

या उपक्रमास भाजपचे रोहा तालुका उपाध्यक्ष रवींद्र तारु शेट, आंबेवाडी जिल्हा परिषद अध्यक्ष रवींद्र मामलूसकर, वरसगाव बूथ अध्यक्ष रवींद्र शिंदे, रोठ खुर्द बूथ प्रमुख सचिन मोरे, दक्षिण रायगड महिला मोर्चा चिटणीस श्रद्धा घाग, रितेश घाग, निखिल धनावडे, प्रशांत यादव, मुख्याध्यापक उमेश महाडेशवर, उपशिक्षक अविनाश पाटील, मोठे यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# हरवलेला मुलगा काही तासांतच कुटुंबियांकडे सुपूर्द

**खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

हरवलेल्या अल्पवयीन मुलांला रसायनी पोलिसांनी काही तासांतच पालकांच्या हवाली केले. त्यामुळे कौतुक होत आहे.

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत वावेघर गावात रात्री सव्वा नऊच्या सुमारास १२ वर्षीय मुलगा गोंधळलेल्या अवस्थेत आणि रडत असलेला स्थानिकांना दिसला. नागरिकांनी रसायनी पोलीस ठाण्याशी संपर्क साधला असता पोलिसांनी तातडीने मुलाला ताब्यात घेत धीर देत विचारपूस केली. मुलाने त्याचे नाव आकाश राम कोळी असे सांगितले. तो करंजाडे (पनवेल) येथे राहत असल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या सूचनेनुसार तातडीने पालकांच्या शोधासाठी चक्र फिरवण्यात आले. आकाशचे वडील राम कोळी पनवेल पोलीस ठाण्यात आल्यानंतर त्यांच्याकडे चौकशी केल्यावर हा मुलगा त्यांचा असल्याचे खात्री झाली. त्यानंतर रसायनी पोलिसांनी आकाशला सुखरूप वडिलांच्या ताब्यात दिले.



# आत्करगाव येथे 'लाडकी बहीण'साठी शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे शिबिर नुकताच खालापूर तालुक्यातील आत्करगाव ग्रामपंचायत आणि तलाठी कार्यालय होनाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.



शिबिरात आत्करगाव ग्रामपंचायत हद्दीतील सर्व महिलांचे अर्ज भरून घेण्यात आले. ग्रामपंचायत हद्दीतील महिलांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी आत्करगाव उपसरपंच गणेश पाटील यांनी पुढाकार घेत रायगड जिल्ह्याधिकारी किसन जावळे यांच्या सूचनेनुसार उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, तहसीलदार आयुब तांबोळी आणि मंडळ अधिकारी भरत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली होनाड सजेचे तलाठी आर. बी. कवडे यांच्या उपस्थितीत शेकडो महिलांचे अर्ज भरून घेतले.

या योजनेमुळे गरीब कष्टकरी महिलांना राज्य सरकारतर्फे दरमहा प्रत्येकी १५०० रुपये मिळणार आहेत. या शिबिराची सुरुवात उपसरपंच पाटील आणि तलाठी कवडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली. शिबिराला महिलांनी उदंड प्रतिसाद देऊन मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला.

शिबिरादरम्यान महिलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले तसेच अर्ज प्रक्रियातील विविध बाबींची माहितीही देण्यात आली. पाटील यांनी आपल्या भाषणात या योजनेच्या महत्त्वावर प्रकाश टाकला तसेच महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचे ध्येय व्यक्त केले. त्यांनी महिलांना सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठीही प्रेरित केले.

कार्यक्रमानंतर सर्व महिलांनी आभार मानले आणि या योजनेतून आर्थिक मदत मिळणार असल्याने समाधानही व्यक्त केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनामुळे महिलांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. भविष्यकाळातही अशाच उपक्रमाला उदंड प्रतिसाद देणार असल्याचे आश्वासन देण्यात आले.

## जाहीर नोटीस

मी श्री. यतिन विजय त्रिभुवन, रा. फ्लॅट नं. १०२ ए. विंग सिमरन रेसिडन्सी को. हौ. सोसायटी, प्लॉट नं. २१, सेक्टर - ७, खारघर, ता. पनवेल, नवी मुंबई (मोबाईल नं. ०९००४२३५७७७) तमाम लोकांस कळवितो की,

मौजे नावडे, ता. पनवेल येथील पै. हशम अब्दुल्ला तय्यब यांच्या संपादित मिळकतीबाबत सिडको प्रशासनाकडुन देण्यात येणारा ३४०० चौरस मिटरचा भुखंड दि. २४/१०/२००५ रोजीचे कराराने आम्हाला विक्री केला असुन मोबदल्यापोटी अफसाना अब्बास खान व पै. हशम अब्दुल्ला तय्यब व फैमिदा इस्माईल मर्चंट यांनी आमचेकडुन वेळोवेळी मोबदल्यापोटी प्रचंड रक्कम स्विकारली आहे. आम्ही कराराची पुर्तता करायला तयार होतो व आहोत. त्याबाबत आम्ही त्यांचे सोबत वेळोवेळी पत्रव्यवहार केला असुन त्यांच्या वेळोवेळी प्रत्यक्ष भेटीही घेतल्या आहेत. सदरहु करार पै. हशम अब्दुल्ला तय्यब यांचे पश्चात त्यांची मुलगी श्रीमती फैमिदा इस्माईल मर्चंट व अफसाना अब्बास खान यांचेवर कायदेशीररित्या बंधनकारक असल्याबाबत तसेच कराराची पुर्तता करून मिळणेसाठी पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात स्पेशल मुकदमा नं. ३६४/२०१७ हा दावा दाखल केला असुन सदरहु दावा न्यायप्रविष्ठ आहे.

**सदर दावा पनवेल न्यायालयात दावा प्रलंबीत असतानासुध्दा व मुळ प्रकल्पग्रस्त/भुखंडमालक पै. हशम अब्दुल्ला तय्यब यांची कायदेशीर वारसदार फैमिदा इस्माईल मर्चंट या असतानासुध्दा काही तोतया इसमांनी बनावट वारसांनी मे.एफ. एस. के. बिल्डर्स व डेवलोपर्स व सिडको प्रशासनातील अधिकाऱ्यांशी गैरसंगनमत करून, दावा भुखंडाचे खारघर नोड येथे तोतया वारसांचे नावे वाटप करून भुखंड हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न सुरू करून आमचे होणाऱ्या फसवणुकीबाबत व नुकसानीबाबत लेखी तक्रार दि. १०/०७/२०२४ रोजी मा. चिफ व्हिजीलन्स ऑफिसर, सिडको यांचेकडे केली आहे.**

तरी सदरहु दावा न्यायप्रविष्ठ असुन सदर भुखंडाबाबत आमचे संमत्तीशिवाय अन्य कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये, सदरहु नोटीसीउप्परही कोणताही करार अगर व्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास, तो बेकायदेशीर ठरणारा असुन आम्हाला योग्य व आवश्यक ती कारवाई करावी लागेल व होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी त्यांचेवरच राहील नोंद घ्यावी. कळावे.

**परिशिष्ठ**

**गावाचे नाव - नावडे, ता. पनवेल, जि. रायगड**

**सिडको फाईल नं.१०९**

| युनिट केस नं. | स.नं./हि. नं. | क्षेत्र.हे.आर.पॉ. |
|---|---|---|
| २१३ | ५७/० | ०-१७.४ |
| | ६०/० | ०-२२.८ |
| | ६१/० | १-२०.२ |
| | ६७/० | ०-२७.७ |

सदरहु संपादित मिळकतीबाबत साडेबारा टक्के योजनेनुसार हशम अब्दुल्ला तय्यब यांना सिडको प्रशासनाकडुन देण्यात येणारा **मौजे-नावडे, फेज नं.२, ता. पनवेल, जि. रायगड येथील भुखंड क्र.१२, क्षेत्र सुमारे ३४०० चौ.मी. या वर्णनाचा भूखंड.**

**सही/-**

**श्री. यतिन विजय त्रिभुवन**

# युवा सेना कॉलेज कक्षाचे पदाधिकारी जाहीर

**कर्जत : प्रतिनिधी**

युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेस सरनाईक यांच्या आदेशाने रायगड जिल्ह्यातील युवासेना कॉलेज कक्ष पदाधिकारी यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते सर्व पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.



आमदार महेंद्र थोरवे यांच्या सूचनेनुसार युवासेना कॉलेज कक्षाचे प्रदेश सचिव वैभव मोहिते यांनी कर्जत विधानसभा मतदारसंघातील युवासेना कॉलेज कक्षाचे पदाधिकाऱ्यांची नावे निश्चित करण्यात आली. कॉलेज कक्षाचे कार्यकारिणी सदस्य ओमकार चव्हाण, युवासेना कर्जत विधानसभा मतदारसंघ प्रमुख प्रसाद थोरवे, कर्जत तालुका अधिकारी अमर मिसाळ, कर्जत नगर परिषदेचे माजी नगरसेवक संकेत भासे, कॉलेज कक्ष तालुका अधिकारी हर्षल देशमुख, समन्वयक दैवत देशमुख, रायगड जिल्हा संपर्क प्रमुख सोहम पाटेकर, उत्तर रायगड जिल्हा समन्वयक यश बडेकर, विधानसभा समन्वयक ओंकार शिंदे, सौरभ सोमणे, विधानसभा प्रमुख विशाल बांठिया, सोशल मीडिया समन्वयक आदित्य दळवी आदी उपस्थित होते.

युवासेना कॉलेज कक्षाचे या सर्व पदाधिकारी यांना कर्जत येथील बाळासाहेब भवन येथे नियुक्तीपत्र देण्यात आली. त्यात उत्तर रायगड जिल्हा संघटक आशिष मिणमिणे, विधानसभा सचिव अभिजीत अरुण बोराडे, विधानसभा संघटक विकास कोकाटे, खालापूर तालुका अधिकारी म्हणून ऋषिकेश बैलमारे, उपतालुका अधिकारी विराज पवार, कर्जत उपतालुका अधिकारी हर्षद अनिल भालिवडे, आदित्य जयवंत मुंढे, संघटक साहिल गंगावणे, सक्रिय सदस्य सूरज जाधव, युवती तालुका अधिकारी सलोनी दत्तात्रय दरेकर, कर्जत शहर अधिकारी विजयसिंह राजपूत, उपशहर अधिकारी उत्कर्ष कांबळे, निखिल पोखरनिकर, युवती शहर अधिकारी प्रियंका सूर्यवंशी, खोपोली शहर अधिकारी मुकेश रूपवते, उपशहर अधिकारी सौरव वायकुळे, केतन साळुंके, युवती शहर अधिकारी सानिका वायकुले, उपशहर अधिकारी सानिया कलमकर, नेरळ शहर अधिकारी सूरज साळवी, उपशहर अधिकारी विवेक देसाई, युवती शहर अधिकारी रिया कनोजे, उपशहर अधिकारी प्रगती कराळे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# चंद्रशेखर खानविलकर जिल्हा नियोजन समितीवर

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे महाड विधानसभा अध्यक्ष चंद्रशेखर उर्फ बाबूशेठ खानविलकर यांची जिल्हा नियोजन समितीवर नियुक्ती करण्यात आली असून केली असून खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

या वेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे तसेच त्यांचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. खानविलकर यांची नियोजन समितीवर निवड झाल्यामुळे या मतदारसंघातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी सुचविलेल्या विकासकामांना अधिक गती मिळेल तसेच समस्या व अडचणी मार्गी लागतील अशी अशा आहे.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे निजामपूर विभाग अध्यक्ष संदीप जाधव, रायगड जिल्हा युवक उपाध्यक्ष अनंता महाडिक, नि. वि. सचिव किरण पागार, मुंबई निजामपूर अध्यक्ष सुनील तेलंगे, माजी सभापती तुकाराम सुतार, शिरवली सरपंच सदानंद पावसारे, संदीप माने, भाऊ होगाडे, जनार्दन शिलीमकर, योगेश निजापकर, भागोजी भोसले, हिरामण गायकवाड, भाले सरपंच दत्ताराम खांबे, शरद सावंत, बाबू पोळेकर, महेश शिर्के, एकनाथ मानकर यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी खानविलकर यांना शुभेच्छा दिल्या.




## कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित) पनवेल

### एकोणतीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

स. न.वि.वि.

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,** पनवेल या संस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २७/०७/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ''ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, जुना ठाणा नाका रोड, पनवेल'' येथे पुढील कामकाजाचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी आपण या सभेस वेळेवर अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामे**

१- मागील दि. १५/०७/२०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व मान्यता देणे.
२- सन २०२३-२०२४ चे वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकावर चर्चा करणे व स्विकृत करणे.
३- कायदा व नियम यास अनुसरुन नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
४- सन २०२३-२०२४ चा वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल स्विकारणे व सन २०२२- २३ च्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
५- पुढील वर्ष सन २०२४-२५ सालाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६- सन २०२४-२५ सालाकरिता अंतर्गत लेखापरिक्षकाची लेखापरिक्षण कामी नेमणूक करण्याचे अधिकार संचालक मंडळाला देणे बाबत.
७- सन २०२४-२५ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची लेखापरिक्षण कामी नेमणूक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे.
८- नियम ४९ नुसार संचालक मंडळाने मंजुरी दिलेल्या थकीत कर्जे निर्लेखीत प्रस्तावास मंजुरी देणे बाबत.
९- वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित राहिलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापीत करणे.
१०-मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

**स्थळ :- पनवेल**
**दिनांक :- ११/०७/२०२४**

आपला विश्वासू

**सही/-**
**सौ. मालती चंद्रकांत आंग्रे**
**अध्यक्षा**

टिप - गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास सदर सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्यापूर्तीची आवश्यकता असणार नाही.


# कोकण मराठी साहित्य परिषदेची वर्षासहल उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद शाखा रोहा-मुरूड-तळा व माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा निवी येथील ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र जाधव यांच्या बयोज फार्म या ठिकाणी वर्षा सहली काढण्यात आली. या वेळी २५ वर्षे नगरसेवकपद भूषवलेले संजय गुंजाळ यांचा षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा व महाकवी कालिदास दिन उत्साहात झाला.



या कार्यक्रमास कोमसाप जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ, समन्वयक अ.वि.जंगम, केंद्रीय प्रतिनिधी पत्रकार गणेश कोळी, दुर्ग अभ्यासक तथा लेखक सुखद राणे, कोमसाप रोहा अध्यक्ष संध्या दिवकर, सचिव विजय दिवकर, माणगाव शाखा अध्यक्ष अजित शेडगे आदी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात मुरूड शाखाध्यक्ष माजी नगरसेवक संजय गुंजाळ यांचे अभीष्टचिंतन, दीपप्रज्वलन, महाकवी कालिदास प्रतिमा पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे पुष्प व दैनंदिनी देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात रोहा शाखा अध्यक्ष संध्या दिवकर यांनी कार्यक्रमाचे स्वरुप स्पष्ट केले. गुंजाळ यांचे साठ दिव्यांनी औक्षण व शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

दुसऱ्या सत्रात आयोजित कविसंमेलनात ३० कवींनी आपल्या वेगवेगळ्या विषयावर कवितेचे सादरीकरण केले. कविसंमेलनाचे अध्यक्षपद रायगडभूषण सुखद राणे यांनी भुषविले.

अभीष्टचिंतन सोहळ्याचे सूत्रसंचालन तळा शाखा अध्यक्ष हेमंत बारटक्के यांनी, तर कविसंमेलनाचे निवेदन डॉ. चौधरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रोहा शाखा सचिव विजय दिवकर, जिल्हा युवाशक्तीप्रमुख सिद्धेश लखमदे व रोहा टीमने परिश्रम घेतले.

# श्रीलंका दौऱ्यापासून गंभीर पर्व

## भारतीय संघ खेळणार टी-२०, वनडे सामन्यांची मालिका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सध्या झिम्बाब्वेविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळत आहे. झिम्बाब्वे दौऱ्यानंतर भारतीय संघ जुलै आणि ऑगस्टमध्ये श्रीलंकेचा दौरा करणार आहे. बीसीसीआयने या मालिकेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. श्रीलंका मालिकेसाठी भारतीय संघ अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही, पण या मालिकेपासून भारताचे नवे प्रशिक्षक गौतम गंभीर संघाची धुरा सांभाळतील.



भारतीय संघ जुलै आणि ऑगस्टमध्ये श्रीलंका दौऱ्यावर पल्लेकले आणि कोलंबो येथे तीन टी-२० आणि तीन एकदिवसीय सामने खेळेल. पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर २६, २७ आणि २९ जुलै रोजी टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाईल. यानंतर एकदिवसीय मालिकेतील सामने १, ४ आणि ७ ऑगस्टला कोलंबोमधील आर प्रेमदासा आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवले जातील.

टी-२० विश्वचषकानंतर श्रीलंका क्रिकेट संघाचा हा पहिलाच दौरा असेल. श्रीलंकेचा संघ टी-२० विश्वचषकात चांगली कामगिरी करू शकला नाही आणि गट सामन्यातील फेरीत बाहेर पडला. भारत-श्रीलंका मालिकेपूर्वीच दोन्ही संघांचे प्रशिक्षक बदलले आहेत. गौतम गंभीर भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक आहेत, तर सनथ जयसूर्याला श्रीलंकेचे मुख्य प्रशिक्षक म्हणून जबाबदारी मिळाली आहे.

भाराताविरुद्धच्या मालिकेपूर्वीच श्रीलंकेचा कर्णधार वनिंदू हसरंगाने कर्णधारपदाचा राजीनामा दिला आहे. दुसरीकडे या मालिकेसाठी भारताचे वरिष्ठ खेळाडू म्हणजेच रोहित शर्मा, विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह यांना विश्रांती देण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे. त्यामुळे दोन्ही मालिकांसाठी संघाचा कर्णधार कोण असणार याची सर्वांनाच उत्सुकता आहे.

हार्दिक पांड्याकडे टी-२० आंतरराष्ट्रीय संघाची कमान सोपवली जाऊ शकते, तर केएल राहुलला एकदिवसीय संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त केले जाऊ शकते.

# अँडरसनच्या मते सचिन सर्वोत्तम फलंदाज

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील शेवटचा सामना वेस्ट इंडिजविरुद्ध खेळत आहे. विक्रमी १८८ कसोटी सामने खेळणाऱ्या अँडरसनने २००३मध्ये पदार्पण केले होते. अँडरसनला विचारण्यात आले की, त्याने ज्या फलंदाजांना गोलंदाजी दिली त्यापैकी सर्वोत्तम फलंदाज कोण आहे. यावर त्याने भारताच्या दिग्गज फलंदाजाचे नाव घेतले.

स्काय स्पोर्ट्सशी बोलताना एका प्रश्नाचे उत्तर देताना अँडरसन म्हणाला, मी गोलंदाजी केलेला सर्वोत्तम फलंदाज म्हणजे सचिन तेंडुलकर. अँडरसनने भारतीय संघाविरुद्ध कसोटीमध्ये सर्वाधिक विकेट घेतले आहेत. त्याने भारताविरुद्ध १४९ विकेट्स घेतल्या आहेत, ज्यामध्ये सचिन तेंडुलकरला



कसोटीत एकूण ९ वेळा बाद केले आहे.

सचिनविषयी बोलताना अँडरसनने म्हटले, मी सचिनला नऊ वेळा बाद केले असेल, पण त्याच्याविरुद्ध कोणतीही निश्चित योजना करू शकलो नाही. मला आठवत नाही की, सचिनविरुद्ध कधी खास रणनिती आखली होती.

अँडरसन पुढे म्हणाला, तो एकदा मैदानात फलंदाजीला आला की मी फक्त इतकाच विचार करायचो मी त्याला एकही खराब चेंडू टाकू शकत नाही. तो खेळाडूही तसाच होता. तो भारतासाठी इतका महत्त्वाचा खेळाडू होता की त्याला बाद केल्यानंतर भारतातील मैदानावरील चित्र बदलून जायचे. सचिनची विकेट खूप मोठी असायची.

अँडरसनने सांगितले की, मी आणि तेंडुलकरने एकमेकांविरुद्ध यश मिळवले आहे. तो म्हणाला, तुम्ही नेहमीच सर्वोत्तम चेंडू टाकण्याचा प्रयत्न करता आणि आशा करता की तो सरळ चेंडूवर चूक करेल. इंग्लंडमध्ये तो एक-दोनदा खेळायचा, पण साधारणपणे मी त्याला लवकर एलबीडब्ल्यू आऊट करण्याचा प्रयत्न करायचो.

अँडरसनने २१ वर्षे कसोटी क्रिकेट खेळून वेगवान गोलंदाजांसाठी एक आदर्श ठेवला आहे. १८८ कसोटी सामने खेळणारा एखादा गोलंदाज पुन्हा क्वचितच घडेल असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ७०० विकेट घेणारा तो पहिला वेगवान गोलंदाज आहे.

## अखेरच्या सामन्यात अँडरसनचा विश्वविक्रम

**लंडन** : इंग्लंड क्रिकेट संघाचा उत्कृष्ट वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन याने त्याच्या अखेरच्या कसोटीत एक अनोखा विक्रम आपल्या नावे केला. अँडरसनने वेस्ट इंडिजविरुद्ध दहावे षटक टाकून इतिहास रचला. यासह १८८ कसोटी सामन्यांमध्ये अँडरसनने गोलंदाजी करताना ४० हजार चेंडू टाकले आहेत.

क्रिकेटच्या सर्वात लांब फॉरमॅटमध्ये वेगवान गोलंदाज म्हणून तब्बल ४० हजार चेंडू टाकणारा अँडरसन पहिला खेळाडू ठरला. अँडरसनच्या आधी श्रीलंकेचा मुथय्या मुरलीधरन, भारताचा अनिल कुंबळे आणि ऑस्ट्रेलियाचा शेन वॉर्न यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४० हजार चेंडू टाकले होते, पण हे तिघेही फिरकी गोलंदाज होते, तर अँडरसन हा वेगवान गोलंदाज आहे.

दरम्यान, इंग्लंडने तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात वेस्ट इंडिजचा पराभव करून अँडरसनला विजयी निरोप दिला.

# बल्गेरियाई बॅडमिंटन स्पर्धेत रक्षा कंदासामीला रौप्यपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनची खेळाडू रक्षा कंदासामी हिने बल्गेरियाई ज्युनिअर ओपन चॅम्पियनशीप २०२४मध्ये भारताकडून प्रतिनिधीत्व करताना रौप्यपदक पटकाविले. ही स्पर्धा बल्गेरियातील पाझार्डझिक येथे झाली.

१६ वर्षीय रक्षा हिने याआधीही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकली आहेत. नुकतेच तिने बल्गेरियन ज्युनियर ओपन चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक जिंकून चांगला फॉर्म कायम ठेवला. रक्षा ही नवी मुंबईतील नेरूळ येथील पोद्दार इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलमध्ये इयत्ता अकरावीत शिकते. तिने आता पुलेला गोपीचंद यांच्या अकॅडमीत प्रशिक्षणास सुरुवात केली आहे.

या यशाबद्दल रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि इतर पदाधिकाऱ्यांनी रक्षाचे अभिनंदन केले.

# विम्बल्डन : आज पाओलिनी-बार्बोरा अंतिम लढत

**लंडन : वृत्तसंस्था**

सातव्या मानांकित इटलीच्या जॅस्मिन पाओलिनीने संघर्षपूर्ण लढतीत क्रोएशियाच्या डोना वेकिचचा पराभव करत प्रथमच विम्बल्डन टेनिस स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. जेतेपदासाठी तिची गाठ शनिवारी (दि. १३) चेक प्रजासत्ताकच्या बार्बोरा क्रेजिकोवाशी पडणार आहे.

उपांत्य लढतीत पाओलिनीने वेकिचवर २-६, ६-४, ७-६ (१०-८) असा विजय मिळवला. त्यामुळे २०१६नंतर एकाच हंगामात फ्रेंच आणि विम्बल्डन ग्रँडस्लॅम स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारी ती पहिलीच महिला टेनिसपटू ठरली. उपांत्य फेरीच्या लढतीत पाओलिनीला वेकिचकडून कडवा प्रतिकार झाला. वेकिचने झंझावाती सुरुवात करताना पहिला सेट जिंकला, मात्र दुसऱ्या सेटमध्ये पाओलिनीने पुनरागमन केल्याने सामन्यात बरोबरी झाली. तिसऱ्या सेटमध्ये बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी टायब्रेकर खेळवावा लागला. यात पाओलिनीने १०-८ अशी बाजी मारत अंतिम फेरीत स्थान मिळवले. अन्य उपांत्य लढतीत क्रेजिकोवाने एलिना रायबाकिनाचा पराभव केला.

# आत्माराम मोरे चषक शालेय कबड्डी स्पर्धेत १२ संघांमध्ये चुरस

**मुंबई : प्रतिनिधी**

आत्माराम मोरे प्रतिष्ठान व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे रोझरी हायस्कूल डॉकयार्ड (मुंबई)च्या सहकार्याने कबड्डी दिनी १५ जुलै रोजी होणाऱ्या कबड्डीप्रेमी आत्माराम मोरे स्मृतीचषक विनाशुल्क इनडोर कबड्डी स्पर्धेच्या विजेतेपदासाठी शालेय १२ संघात चुरस होईल. रोझरी हायस्कूल विरुद्ध समता हायस्कूल घाटकोपर यांच्यात स्पर्धेची उद्घाटनीय लढत होईल.

उद्घाटन समारंभास आत्माराम मोरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष अश्विनीकुमार मोरे, रोझरी हायस्कूलचे फादर नाईजील बॅरेट व प्रिन्सिपल सिस्टर विजया चलील, आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते व अध्यक्ष लीलाधर चव्हाण आदी उपस्थित राहणार आहेत. डॉकयार्ड येथील रोझरी हायस्कूल सभागृहात मॅटवर ही स्पर्धा टायब्रेकरसाठी होणाऱ्या ५-५ चढायांमध्ये रंगणार आहे.

प्रतिष्ठेचा कबड्डीप्रेमी आत्माराम मोरे स्मृतीचषक पटकाविण्यासाठी अँटोनियो डिसोझा हायस्कूल भायखळा, ज्ञानेश्वर विद्यालय वडाळा, सावित्रीबाई फुले शाळा घाटकोपर, अफॅक हायस्कूल चेंबूर, सेंट जोसेफ हायस्कूल उमरखाडी, सर एली कदुरी हायस्कूल माझगाव, ताराबाई मोडक हायस्कूल दादर, सेंट मेरी हायस्कूल माझगाव, रोझरी हायस्कूल डॉकयार्ड आदी संघांमध्ये चुरस असेल. प्रशिक्षक प्रॉमिस सैतवडेकर, शिक्षक मोझेस लोपेस व राम गुडमे, क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक व सुनील खोपकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींचे स्पर्धेदरम्यान शालेय खेळाडूंना मार्गदर्शन लाभणार आहे.

प्रायोगिक स्वरूपातील इंडोर कबड्डी स्पर्धेमधील पहिल्या आठ विजेत्या-उपविजेत्यांना आकर्षक पुरस्कार व वैयक्तिक पदके दिली जाणार आहेत. विजेत्या पहिल्या दोन संघांना आत्माराम मोरे शालेय सुपर लीग कबड्डी स्पर्धेत थेट प्रवेश दिला जाईल.

# कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेत उद्या कोलंबिया-अर्जेंटिना फायनल

### तिसऱ्या स्थानासाठी उरुग्वेची कॅनडाशी लढत

**शार्लोट (उत्तर कॅरोलिना) : वृत्तसंस्था**

कोलंबियाने दमदार कामगिरी सुरू ठेवताना तुल्यबळ उरुग्वेला १-० असे पराभूत करीत कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. आता जेतेपदासाठी कोलंबियाची लिओनेल मेसीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिना संघाशी रविवारी (दि. १४) गाठ पडेल. उरुग्वेचा संघ तिसऱ्या स्थानासाठी कॅनडाचा सामना करेल. कोलंबियाने यापूर्वी २००१मध्ये कोपा अमेरिका स्पर्धेचे जेतेपद मिळवले आहे.



सामन्याच्या सुरुवातीपासूनच दोन्ही संघांकडून आक्रमक आणि धसमुसळा खेळ पहायला मिळाला. या सामन्यात सात खेळाडूंना पिवळी, तर एकाला लाल कार्ड दाखवण्यात आले. दोन्ही संघांतील खेळाडूंमध्ये धक्काबुक्कीही झाली. कोलंबियाचे सामन्याच्या सुरुवातीपासूनच गोल करण्याचे प्रयत्न सुरू होते.

३९व्या मिनिटाला कर्णधार हामेस रॉड्रिगेझच्या कॉर्नर किकला जेफर्सन लेर्माने गोलजाळीची दिशा देत कोलंबियाला १-० असे आघाडीवर नेले. लेर्माचा हा स्पर्धेतील दुसरा गोल ठरला. रॉड्रिगेझने या स्पर्धेत आतापर्यंत सहा गोलसाहाय्य (असिस्ट) नोंदवले आहेत. कोलंबियाने मध्यंतरापर्यंत आपली आघाडी कायम राखली.

उत्तरार्धात उरुग्वेकडून गोल करण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी अनुभवी आघाडीपटू लुईस सुआरेझला मैदानावर उतरवण्याचा प्रशिक्षक मार्सेलो बिएल्सा यांनी निर्णय घेतला. सुआरेझ सामन्याच्या ६६व्या मिनिटाला मैदानात आला आणि ७१व्या मिनिटाला त्याचा फटका गोलपोस्टच्या बाजूने गेला. यानंतर कोलंबियाने उरुग्वेला गोल करण्यापासून रोखले व अंतिम फेरीतील स्थान निश्चित केले.

# स्कॉटलंडच्या फलंदाजाची तुफानी द्विशतकी खेळी



**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याने श्रीलंकेविरुद्ध खेळलेली २६४ धावांची खेळी क्रिकेटप्रेमी कधीच विसरू शकत नाहीत. वन-डे क्रिकेटमध्ये त्याच्या इतकी स्फोटक खेळी कोणीही खेळू शकलेले नाही, पण नुकताच एका फलंदाजाने त्याच्या खेळीच्या नजीक जाणारी झंझावाती खेळी केली. स्कॉटलंड ए आणि ओमान यांच्यातील सामन्यात स्कॉटलंडच्या ऑलिव्हर हेअर्स या डावखुऱ्या फलंदाजाने रोहितसारख्या बिनधास्त शैलीत खेळत केवळ १३० चेंडूत २५५ धावांची खेळी केली. ३३ वर्षीय ऑलिव्हर फलंदाज सलामीला आणि त्याने क्रीझवर येताच चौकार-षटकारांची बरसात केली. त्यामुळे संघ जिंकला.







The Management, Principal, Staff and Students of
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**CHANGU KANA THAKUR**

**Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)**

Re-accredited 'A Grade by NAAC (3rd Cycle - CGPA 3.61)
'College with Potential for Excellence' Status Awarded by UGC
'Best College Award' by University of Mumbai

request the pleasure of your august presence on the occasion of

**Day of Remembrance of Late Shri. Changu Kana Thakur Saheb & Felicitation Ceremony of Meritorious Students**

**on Saturday July 13, 2024 at 10:30 a.m.**

**Chief Guests**

**Hon'ble Shri. Chandrakant Dalvi, IAS (Retd.)**
Chairman,
Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon'ble Shri. Prashant Thakur, M.L.A.**
Member, Board of Executives,
J.B.S.P. Sanstha, Panvel

**President**

**Hon'ble Shri. Ramsheth Thakur,** Ex. M.P.
Chairman, J.B.S.P. Sanstha, Panvel

**Guests of Honour**

**Hon'ble Shri. Arunsheth Bhagat**
President, J.B.S.P. Sanstha, Panvel &
President, Panvel Taluka BJP

**Hon'ble Shri. Y. T. Deshmukh**
Vice-Chairman, J.B.S.P. Sanstha,
Panvel

**Hon'ble Dr. (Mrs.) Kavita Choutmal**
Ex-Mayor,
Panvel Municipal Corporation

**Hon'ble Shri. Paresh Thakur**
Leader of the House, PCMC &
Member, Board of Executives,
J.B.S.P. Sanstha, Panvel

**Hon'ble Shri. Anil Bhagat**
Member, Board of Executives,
J.B.S.P. Sanstha, Panvel

**Hon'ble Mrs. Seetatai Patil**
Ex-Deputy Mayor,
Panvel Municipal Corporation

**Hon'ble Shri. Manohar Mhatre**
Ex-Member,
Panvel Municipal Corporation

**Hon'ble Mrs. Hemlata Mhatre**
Ex-Member,
Panvel Municipal Corporation

**Hon'ble Shri. Sanjay Bhagat**
Member, Board of Executives,
J.B.S.P. Sanstha, Panvel

**Hon'ble Shri. Eknath Gaikwad**
Ex-Member,
Panvel Municipal Corporation

**Hon'ble Shri. Nitin Patil**
Ex-Member,
Panvel Municipal Corporation

**Hon'ble Prin. Dr. S. T. Gadade**
Secretary, J.B.S.P. Sanstha, Panvel

**Kindly grace the occasion with your precious presence**

**Dr. (Mrs.) R. D. Mhatre**
In-charge,
Women Development Cell

**Dr. (Mrs.) M. A. Mhatre**
In-charge.
Student's Council and Welfare

**Prof. Dr. S. K. Patil**
Principal.
C. K. Thakur A. C. S. College,
New Panvel

Address: Plot No.-01, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Dist. - Raigad, Pin - 410 206


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com